


नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR

Physioflex®
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
**Dr. Moinuddin Farooque** (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
**Shivraya Multi Speciality Hospital,** DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५२ वे, अंक २९३
Year : 52, Issue No. : 293

नाशिक, सोमवार दि. ७ एप्रिल २०२५
Nashik, Monday 7 April 2025

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## पत्नी नांदण्यास येत नसल्याने सासुरवाडीचे घर जाळले

### नवरा-बायकोसह सासू जखमी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- माहेरी गेलेली पत्नी नांदण्यास येत नसल्याने संतप्त झालेल्या नवऱ्याने सासुरवाडीचे घर जाळल्याची घटना सिन्नर तालुक्यातील सोनारी गावात घडली. यामध्ये सासू बायकोसह स्वतः नवरा देखील जखमी झाला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, अनिता शिंदे ही महिला मागील काही महिन्यांपासून आपल्या नवऱ्याला सोडून माहेरी राहत होती. तिचा पती काल तिला रात्री घेण्यासाठी गेला होता. परंतु त्यावेळेस तिने येण्यास नकार दिल्यामुळे संतप्त झालेल्या नवऱ्याने संतापाच्या भरात सासूच्या घरावर ज्वलनशील पदार्थ टाकून घर पेटवून दिले. या आगीत घरातील सामान पूर्णपणे जळून खाक झाले असून सासू, पत्नी व घर जाळणारा नवरा असे तिघेही जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून, याबाबत सिन्नर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तीन महिलांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** पोलीस ठाण्याच्या आवारात तीन महिलांमध्ये एकमेकींच्या झिंज्या ओढून फ्री स्टाईल हाणामारी झाल्याची घटना नाशिकरोड येथे घडली. याबाबत पोलीस शिपाई शीतल गवळी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले, की संशयित महिला आशा किशोर पाथरे (वय ३०), रेखा सुनील आल्हाट (वय ४५) व सीमा बाळू राखपसरे (वय ३०, तिघेही रा. नाशिकरोड) या तीन महिला काल (दि. ६) दुपारी १२ वाजेच्या सुमारास नाशिकरोड पोलीस ठाण्यात आल्या होत्या. या महिलांनी अज्ञात कारणातून पोलीस ठाण्याच्या आवारात सार्वजनिक ठिकाणी एकमेकींना मारहाण व शिवीगाळ करून एकमेकींच्या झिंज्या ओढून एकमेकींशी झोंबाझोंबी करून फ्री स्टाईल हाणामारी केली. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ट्रम्प यांच्या धोरणामुळे शेअर बाजारात हाहा:कार

**नवी दिल्ली (भ्रमर वृत्तसेवा) :- भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली आहे. भारताप्रमाणे आशियाई शेअर बाजारसुद्धा मोठ्या घसरणीसह उघडले. जपान, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया यासारख्या मोठ्या बाजारपेठांमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे टॅरिफ धोरण आहे.**

शेअर बाजार उघडला तेव्हा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचा ३० शेअर्सचा सेन्सेक्समध्ये ३००० हून अधिक अंकांची घसरण झाली. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १००० हून अधिक अंकांच्या घसरणीसह व्यवहार करू लागला. टाटा मोटर्सपासून ते माझगाव डॉकपर्यंतचे शेअर्स सुरुवातीच्या व्यवहारात झपाट्याने घसरले. भारताप्रमाणे आशियाई शेअर बाजारसुद्धा मोठ्या घसरणीसह उघडले. जपान, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया यासारख्या मोठ्या बाजारपेठांमध्ये मोठी घसरण नोंदवण्यात आली. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे टॅरिफ धोरण आहे.

शेअर बाजारातील व्यवहाराच्या प्रारंभी बीएसई सेन्सेक्स ७५,३६४.६९ च्या मागील बंदच्या तुलनेत ७१,४४९ च्या स्तरावर घसरला आणि उघडला, तर एनएसई निफ्टीने मागील २२,९०४ च्या बंदच्या तुलनेत २१७५८ वर व्यापार सुरू केला. यानंतर दोन्ही निर्देशांक थोड्याच वेळात आणखी घसरायला लागले. निफ्टी-५० १००० अंकांनी घसरून २१,७४३ वर आला. तर सेन्सेक्स ७१,४२५ च्या पातळीवर व्यवहार करताना दिसला.

अर्थतज्ज्ञ म्हणाले, सामान्य गुंतवणूकदारांनी सध्या 'वेट अँड वॉच'ची भूमिका ठेवावी. घाबरुन विक्री करू नये. शेअर बाजार ओव्हर रिॲक्ट करत आहे. परिस्थिती इतकी खराब नाही. सर्वांचे लक्ष सध्या ट्रम्प यांच्या पुढील घोषणांकडे आहे. गुंतवणूकदारांनी टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करावी, असे त्यांनी म्हटले.

शुक्रवारी बीएसईचा सेन्सेक्स ९३०.६७ अंकांनी म्हणजेच १.२२ टक्क्यांनी घसरला होता. ७५,३६४.६९ वर बंद झाला होता. तर एनएसईचा निफ्टी ३४५.६५ अंकांनी किंवा १.४९ टक्क्यांनी घसरून २२,९०४.४५ वर बंद झाला होता.

आज भारतीय शेअर बाजारासाठी आधीच जागतिक बाजारातून घसरणीचे संकेत मिळाले होते. आशियाई शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण दिसून आली. हाँगकाँगचा हँग सेंग ९ टक्क्यांहून अधिक घसरला होता, तर जपानचा निक्केई ८ टक्क्यांहून अधिक घसरला होता. आज टाटा स्टील शेअरमध्ये मोठी घसरण झाली. हा शेअर १०.४३ टक्क्यांनी घसरून १२५.८० रुपयांवर आला. याशिवाय टाटा मोटर्स शेअर (८.२९%), इन्फोसिस शेअर (७.०१%), टेक महिंद्रा शेअर (६.८५%), एलटी शेअर (६.१९%), एचसीएल टेक शेअर (५.९५%), अदानी पोर्ट्स शेअर (५.५४%), टीसीएस शेअर (४.९९%), रिलायन्स शेअर (४.५५%) आणि ४.०४ एनटीपीसी शेअर (४.५५%) घसरलक्ष आहेत.

## वडाळा नाका येथून ट्रकची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** वजनकाट्यासाठी सर्व्हिस रोडच्या कडेला उभा असलेला भंगार घेऊन जाणारा ट्रक अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी आनंद नंदकिशोर पंचारिया (रा. चव्हाणनगर, तपोवन, पंचवटी) यांनी दि. ३ एप्रिल रोजी साडेदहा वाजेच्या सुमारास वडाळा नाक्याजवळील द्वारका वजनकाट्याजवळ सर्व्हिस रोडच्या कडेला १० लाख १० हजार रुपये किमतीचा २६ हजार ३६० किलोग्रॅम वजनाचा भंगाराचा माल व २ लाख रुपये किमतीचा एमएच ४१ जी ६८२६ या क्रमांकाचा ट्रक उभा केला होता. हा ट्रक अज्ञात चोरट्यांनी त्यांची नजर चुकवून लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चोरीच्या विविध घटनांमध्ये लाखो रुपयांचा ऐवज लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शहर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चोरीच्या विविध घटनांमध्ये अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चोरीचा पहिला प्रकार राजेबहादूर हॉस्पिटलजवळ घडला. फिर्यादी शफिया अनिस शेख (वय ६५, रा. सिडको, नाशिक) या शालिमार येथून नाईकवाडीपुरा येथून पायी जात होत्या. त्यावेळी दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व त्यांना म्हणाले, की येथून जवळच गरिबांना कपडे वाटप करीत आहे. कपडे घेऊन जा, असे म्हणून हे दोन अनोळखी इसम त्यांना राजेबहादूर हॉस्पिटलनजीक एका बंद दुकानाजवळ घेऊन गेले. त्यांना पिशवी खाली ठेवण्यास सांगून त्यांना दोघा इसमांपैकी एका इसमाने महिलेला बोलण्यात गुंतविले. त्याच वेळी दुसऱ्या इसमाने फिर्यादी शेख यांनी पिशवीत ठेवलेल्या लहान पाकिटातील ३० हजार रुपये किमतीची नऊ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत व ४०० रुपये रोख असा ३० हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात अज्ञात दोन अनोळखी इसमांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार बोळे करीत आहेत.

चोरीचा दुसरा प्रकार सिन्नर फाटा येथे घडला. फिर्यादी संदीप रामचंद्र कांबळे (रा. देवळाली गाव) यांनी सिन्नर फाटा येथे एका टपरीलगत एमएच १५ जीवाय ४६४६ या क्रमांकाची ३५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल उभी केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात मोटारसायकलचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार पवार करीत आहेत.

चोरीचा तिसरा प्रकार जेलरोड येथे घडला. फिर्यादी सूरज ई (रा. साने गुरुजीनगर, जेलरोड, नाशिक) यांनी केएल ५२ एम ६९७७ या क्रमांकाची ६० हजार रुपये किमतीची रॉयल एनफिल्ड बुलेट सोसायटीच्या पार्किंगमध्ये उभी केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार हिवाळे करीत आहेत.

चोरीचा चौथा प्रकार वकीलवाडी येथे घडला. फिर्यादी यश दीपक साळवे (रा. अभियंतानगर, अंबड) यांचे एम. जी. रोडवरील वकीलवाडी येथे फियास्टा प्रा. लि. चे कॅशिफाय नावाचे मोबाईल स्टोअर आहे. या स्टोअरमध्ये दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास दोन अनोळखी इसम आले. त्यांनी तेथे असलेला २० हजार रुपये किमतीचा आयफोन साळवे यांची नजर चुकवून लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात दोन अनोळखी इसमांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार बागूल करीत आहेत.

## काळाराम मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकाची चेन लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** श्रीरामनवमीनिमित्त काळाराम मंदिरात दर्शनासाठी आलेल्या शेगावच्या भाविकाची दीड तोळा वजनाची सोन्याची चेन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील एक भाविक रामनवमीनिमित्त काळाराम मंदिरात दर्शनासाठी आले होते. यावेळी तेथे असलेल्या गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने भाविकाच्या गळ्यात असलेली ६० हजार रुपये वजनाची सोन्याची चेन चोरून नेली. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## सावत्र बापाकडून चिमुकलीवर अत्याचार

**जालना (भ्रमर वृत्तसेवा) :-** जालन्यात सहा वर्षाच्या चिमकुलीवर आईच्या प्रियकराकडून लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली. कदीम जालना पोलिसांनी त्या नराधमाच्या मुसक्या आवळल्या आहेत.

प्रशांत प्रकाश वाडेकर असे या आरोपीचे नाव आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील एक २८ वर्षीय महिला पतीपासून विभक्त झालेली असून, ती जुना जालना भागात खोली भाड्याने घेऊन राहत आहे. तिला पहिल्या पतीपासून तीन मुली व एक मुलगा झालेला असून, त्यापैकी एक मुलगा व एक मुलगी पतिकडे जिंतूर येथे राहतात. तर एक ६ व दुसरी ४ वर्षाची मुलगी त्या महिलेकडे राहत आहे.

महिला साफसफाई आणि घरगुती काम करून तिचा व मुलींचा उदरनिर्वाह भागवते. अशाच दोन वर्षांपूर्वी तिची एका हॉटेलमध्ये मॅनेजर म्हणून काम करणाऱ्या प्रशांत प्रकाश वाडेकर याच्याशी ओळख झाली होती. तेव्हापासून ती महिला आणि वाडेकर हे दोघे दोन वर्षांपासून भाड्याच्या खोलीमध्ये एकत्रच लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. महिला कामानिमित्त घराबाहेर असते, तर वाडेकर हा दिवसभर घरी राहून रात्री हॉटेलमध्ये कामावर जातो. प्रशांत वाडेकर याने महिला घरी नसतांना तिच्या ६ वर्षीय मुलीवर अनैसर्गिक कृत्य करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मुलीने तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार आपल्या आईला सांगितला. त्यानंतर पिडीत मुलीच्या आईने जालना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी प्रशांत वाडेकर याला ताब्यात घेतले आहे.

# आजपासून श्री भगवती सप्तशृंगी देवीचा चैत्रोत्सव व श्रीराम नवमीस सुरुवात

**कळवण (भ्रमर वार्ताहर) :-** साडेतीन शक्तीपीठापैकी आद्य स्वयंभू शक्तिपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि पर्यटन स्थळ असलेल्या श्री क्षेत्र सप्तशृंग गडावर श्री सप्तशृंगी देवीची ०६ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान चैत्रोत्सव असून. यासाठी विश्वस्त संस्थेच्या वतीने विविध पूजा व विधींसाठी तयारी झाली असून, भाविकांच्या व्यवस्थेसाठी नियोजन करीत आहे. काल रोजी रामनवमी निमित्त सकाळी साडेसात वाजता श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या मुख्यकार्यालर्यात सुवर्ण अलंकारांची विधिवत पुजा विश्वस्त संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. व्ही. वाघ यांच्या हस्ते झाली. पूजा ते मंदिरापर्यंत देवीच्या सुवर्ण अलंकारांची व आभूषणांची मिरवणूक काढण्यात आली.

सकाळी श्री भगवतीची चांदीच्या मुर्ति व प्रमुख जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीचंद डी.जगमलानी यांनी सकाळी सात ते नऊ वाजेदरम्यान देवीची पंचामृत महापूजा व महाआरती केली. दुपारी १२ वाजता देवी मंदिरात रामनवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव पूजा करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चैत्रोत्सवादरम्यान मंदिर २४ तास खुले ठेवण्यात येणार असून, यादरम्यान दररोज पहाटे काकड आरती, सकाळी पंचामृत महापूजा, दुपार महानैवेद्य आरती व सायंकाळी सांज आरती या तीनही वेळेत भगवतीची आरती झाली. यादरम्यान सकाळ-संध्याकाळ ट्रस्टच्या वतीने मोफत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.



वर्षभरात दोन वेळा यात्रा भरणाऱ्या सप्तशृंग गडावर श्री सप्तशृंग देवीच्या यात्रोत्सवास अनन्यसाधारण महत्त्व असते.

या दरम्यान खान्देशातील लाखो भाविक सप्तशृंग गडावर श्री भगवती सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी पायी हजेरी लावतात. असा हा उत्सव ०६ एप्रिलपासून १२ एप्रिलपर्यंत साजरा होत आहे. तसेच भाविकांच्या सेवा सुविधेत व निवास व्यवस्थेत विश्वस्त संस्थेच्या वतीने डॉर्मेट्री फैसिलीटी सेंटर (शयनकक्ष सुविधा केंद्र) सुरू झाली आहे. तसेच आद्यस्वयंभू श्री सप्तशृंगी माता : व्ही आर ३६० ओ तंत्रज्ञानावर आधारित चालचित्रफीत प्रक्षेपण केंद्राचे उद्घाटन करून अद्यावत माहिती सुविधा ही भाविकांच्या सेवेत आज लोकार्पण करण्यात केली. या दोन्ही सेवांचे उद्घाटन व लोकार्पण प्रमुख जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीचंद डी. जगमलानी व बी. व्हि. वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. व्ही. वाघ, रोहिदास वारुळे, विश्वस्तॲड. ललित निकम, ॲड. दीपक पाटोदकर, सौ. मनज्योत पाटील, भूषणराज तळेकर व डॉ. प्रशांत देवरे, विश्वस्त संस्थेचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहा. व्यवस्थापक तथा कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर तसेच आद्यस्वयंभू श्री सप्तशृंगी माता : व्ही आर ३६० ओ तंत्रज्ञानावर आधारित चलचित्रफिती प्रक्षेपण केंद्राच्या संचालक योगेश बांगर, वास्तुविशारद अमोल सावकार, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, बांधकाम पर्यवेक्षक सागर निश्चित, भक्तनिवास पर्यवेक्षक प्रशांत निकम, विद्युत पर्यवेक्षक अशोक जगताप, स्वच्छता विभाग प्रमुख रणजित उगले, मुरलीधर गावित, तुषार जाधव, जिल्हा न्यायालय व्यवस्थापक अशोक दारके, व्यापारी संघटना अध्यक्ष अजय दुबे, शांताराम गवळी, गिरीश गवळी, ग्रामपंचायत सरपंच रमेश पवार, उपसरपंच संदीप बेनके, राजेश गवळी, पत्रकार तुषार बर्डे, निलेश कदम, इम्रान शाह, रघुनाथ जोशी आदी कर्मचारी व भाविक उपस्थित होते.

## जिल्ह्यात पाण्याचे १४८ टँकर सुरू करण्याची जिल्हा प्रशासनाचे नियोजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** मागील वर्षात चांगला पाऊस झाल्याने नाशिक जिल्ह्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या उन्हाळ्यात फारशी पाणीटंचाई जाणवत नसली तरी जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील काही भागांमध्ये पाणीटंचाई जाणवल्यास टँकर सुरू करण्याचे नियोजन केलेले आहे. त्या संदर्भात तयारी करण्यात आलेली आहे.




जिल्ह्यातील धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी थोडा-अधिक पाणीसाठा असल्याने अद्यापही पाण्याच्या टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली नाही. इगतपुरीतील ६ पाड्यांचा पाणीप्रश्न सोडला तर जिल्ह्याला अद्यापही टँकरची गरज भासलेली नाही. जिल्ह्यातील ४८४ गावे अन ५६८ वाड्यांना १४८ टँकर सुरू करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने ठेवली आहे. यंदा पर्जन्यमान चांगले राहिल्याने पीकपाणीची चांगले आहे. मात्र तरीही जिल्ह्यातील काही ठिकाणी पाणीपुरवठा करण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाने गृहित धरलेली आहे. यासाठी कृती आराखडा तयार ठेवण्यात आला आहे. या कृती आराखड्यात ४६ गावांमध्ये विंधनविहीर आणि १४६ गावांमध्ये खासगी विहीरी अधिग्रहित करण्यात येणार आहे. ८१४ ठिकाणी टँकर आणि बैलगाडीद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ७ कोटी ७० लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

मागील दोन वर्षांत जिल्ह्यात दुष्काळसदृष्य परिस्थिती निर्माण झाल्याने सुमारे ३९९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. यंदा पाणीसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने टँकरची गरज अद्यापही निर्माण झालेली नाही. इगतपुरीतील वाळविहीर, पायरवाडी, खडकवाडी, तळ्याचीवाडी, बकुळीचीवाडी, बैरोबावाडी या पाड्यांसाठी टँकरचा पहिला प्रस्ताव दाखल झाला असून, त्याला मान्यता देण्यात आली आहे. वाढत्या तापमानामुळे भूगर्भातील पाणी पातळी कमी होऊन सार्वजनिक विहिरी, विंधनविहिरींची पाणीपातळी देखील कमी होण्याची शक्यता असल्याने भविष्यामध्ये वाडी-वस्त्यांना टँकरची आवश्यकता भासण्याची शक्यता गृहीत धरण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील सिन्नर, इगतपुरी, पेठ, सुरगाणा या भागातील वाडी- वस्त्यांवर टंचाईच्या झळा जाणवतात. इगतपुरी येथे पाण्यासाठी महिलांनी मोर्चा काढल्याने एक टँकर सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.

# राम जन्मला ग सखी राम जन्मला...

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** श्रीराम नवमीच्या दिवशी भर उन्हात काळाराम मंदिरात 'जय श्रीराम, सियावर रामचंद्र की जय, जय सीता राम सीता' या नामघोषाने दुपारी बारा वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांनी काळारामाचे दर्शन घेतले, तसेच परिसरातील गोरेराम, बायकांचा राम, श्रीराम अशा विविध मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती.

प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पंचवटीतील काळाराम मंदिरात काल श्रीराम नवमीच्या दिवशी रामजन्माचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे पाच वाजता प्रभू रामचंद्रांची काकड आरती करण्यात आली. त्यानंतर काळारामाला अवभृत स्नान घालण्यात आले. यानंतर महाभिषेक आणि पूजा विधी करण्यात आले. या वर्षीच्या



पूजेचे मानकरी हेमंतबुवा अनंत पुजारी यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. दुपारी बारा वाजेच्या ठोक्याला मंदिरातील मुख्य गाभाऱ्यातील श्री काळाराम यांच्या मूर्ती समोरील पडदा हटवून रामजन्म साजरा करण्यात आला. तसेच याठिकाणी ठेवण्यात आलेल्या पाळण्यातील प्रभू रामचंद्रांच्या मूर्तीला झोका देण्यात आला. यावेळी हजारो रामभक्तांनी श्रीरामाचा एकच जल्लोष करीत प्रभू रामचंद्र की जय, सियावर रामचंद्र की जय अशा घोषणा देत संपूर्ण मंदिर परिसर दणाणून सोडला. यासाठी कपालेश्वर येथील वाद्य पथक, पारंपारिक वाद्य, ढोलताशे यांचा देखील याठिकाणी जल्लोष सुरु होता.

महिलांचा यावेळी सहभाग लक्षणीय दिसत होता. यावेळी माहेरवाशीण महिलांनी या काळाराम मंदिरात आपल्या पारंपरिक वेशभूषा धारण करून रामजन्माच्या गाण्यांवर नृत्य सादर केले. याठिकाणी **(पान ६ वर)**



# सुप्रभात



## राशीभविष्य

- **मेष** : नातेवाईक नरमतील. सर्व बाजूनी मदतीचे हात येतील. संततीचे हट्ट पुरवणं त्रासदायक होतील.
- **वृषभ** : प्रत्येक पाऊल जपून टाकावे. कोणाचाही अपमान करू नका. सहकाऱ्यांची मदत मिळेल.
- **मिथुन** : तुमच्या कामाबद्दल वरिष्ठ खूष असतील. संतती प्रगतीपथावर असेल. दुखण्याकडे दुर्लक्ष नको.
- **कर्क** : क्षमतेचा विचार करून शब्द द्यावा. मानभंगाचे काही प्रसंग घडतील. सत्संगाचा अनुभव घ्यावा.
- **सिंह** : सहजीवनाचा पुरेपूर आनंद घ्याल. स्वतःला कमी लेखू नका. खर्चावर नियंत्रण ठेवा.
- **कन्या** : प्रेमजीवनात प्रतिकूल काळ. घरच्यांकडून पाठिंबा मिळणार नाही. आर्थिक उपलब्धता राहील.
- **तूळ** : आर्थिक आवक वाढून मनाला स्थिरता लाभेल. शारीरिक क्षमता वाढेल. कलागुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : कार्यशक्तीला चालना मिळेल. प्रलोभनापासून दूर राहाल. जुन्या गुंतवणुकीतून फायदा होईल.
- **धनु** : तुमच्याबद्दलचे गैरसमज दूर होतील. कामात मन रमेल. आर्थिक बाजू सावरली जाईल.
- **मकर** : दिलेला शब्द पाळणे कठीण जाईल. विरोधक वरचढ होतील. प्रवास सुखदायक होईल.
- **कुंभ** : नावलौकिकात वाढ होईल. सामाजिक कार्यात भाग घ्याल. ठरवलेलं उद्दिष्ट पूर्ण कराल.
- **मीन** : व्यवहारात सतर्क राहणे आवश्यक. मानसिक क्लेशातून जावे लागेल. संतती समाधान देईल.

## ७ एप्रिल

दिनविशेष

**१९११:** समीक्षक वा.ल.कुळकर्णी यांचा जन्म.
**१९२०:** जागतिक कीर्तीचे सतारवादक स्व. पं. रविशंकर यांचा जन्मदिवस.
**१९३५:** 'भारताचा एडिसन' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या शंकर भोसे यांचे निधन.
**१९४५:** रशियन सैन्य व्हिएन्नाच्या सरहद्दीवर. अमेरिकन हवाईदलाने जपानची सर्वात मोठी युद्धनौका यामाटो बुडवली.
**१९६९:** इराणमध्ये बंदिवासातील ओलिसांच्या प्रश्नावरून अमेरिकेने इराणशी राजनैतिक संबंध तोडले.

## सकारात्मक दृष्टीकोन ठेवा

महत्त्वाचे काही

✽ सकारात्मक विचारांमुळे तुम्हाला नवा आत्मविश्वास मिळतो. ✽ कालचा पेपर वाईट गेला म्हणून रडत बसण्यापेक्षा पुढचा पेपर कसा जाईल, याचा विचार करायला हवा. ✽ प्रत्येकाच्या आयुष्यात चढ-उतार येतातच. कधी एखादा पेपर चांगला जातो तर एखादा अवघड जातो. तसंच आयुष्याचं असतं. पण प्रसंग कोणताही आला तरी रडत बसण्यात काहीच अर्थ नसतो. ✽ एखाद्या मित्राशी किंवा मैत्रिणीशी भांडण झाल्यावर तुम्ही एखादा दिवस त्याच्याशी बोलत नाही. पण, पुन्हा तुमची मैत्री सुरु होते. सकारात्मक विचारांमुळेच तुम्ही पुन्हा मैत्री करता. मित्राशी बोलायला लागता. ✽ हाच पॉझिटिव्ह ॲटीट्यूड कायम ठेवा. यामुळे आयुष्यात प्रत्येक वेळी पुढे जाल. कधीही मागे वळून पहावं लागणार नाही. ✽ चेहरा कायम हसरा ठेवा. हसत राहिलात की मनात निगेटिव्ह विचार येणारच नाहीत. परीक्षा असो वा होमवर्क किंवा दुसरं काही... कधीच टेन्शन घेऊ नका. आयुष्यातला प्रत्येक क्षण मस्त एंजॉय करा. बघा रोजचा तुमचा दिवस किती आनंद देऊन जातो ते...

## चव कडू तरी...

आरोग्यमंत्र

कडू चवीच्या कारल्यामध्ये अनेक गुणकारी घटकद्रव्य असतात हे आपण पाहिलं. कारलं शक्तीवर्धक, पुष्ठीकारक आणि सारक असल्यामुळे आहाराबरोबरच औषध म्हणूनही याचा वापर केला जातो.

कारल्याचे औषधी उपयोग आपण पाहू या.

✽ कारलं रक्त आणि लघवीमधली साखर कमी करतं. वजन वाढलेलं आहे आणि मधुमेह आहे अशा लोकांनी आहारात कारलं नियमित ठेवावं. कारल्याचा थेट रस कपभर किंवा ग्लासभर घेऊ नये. घेतला तर जास्तीत जास्त चार ते सहा चमचे या प्रमाणातच घ्यावा. तोही कपभर पाण्यात मिसळून घ्यावा.



✽ चरबी वाढल्यामुळे होणारे आजार आणि विषबाधा यावर नियमित कारल्याचं सेवन करणं हे फार मोठं आणि साधं औषध आहे.

✽ अंगाला पिसूसारखे कीटक चावल्यामुळे अंगाची आग होत असेल तर कारल्याच्या पानांचा रस अंगास चोळावा.

✽ तोंडाला चव नसेल, भूक लागत नसेल, पचन होत नसेल तर कारल्याची भाजी नियमित खावी.

✽ कारलं उत्तम रक्तशुद्धी करतं. त्यामुळे त्वचारोग असणाऱ्या लोकांसाठी ती एक नवसंजीवनी आहे.

✽ पाळीच्या विकारात कारलं उत्तम असून वेळेवर पाळी येत नसेल किंवा पाळी अचानक बंद झाली असेल तर कारल्याचं नियमित सेवन करावं. रातआंधळेपणा असेल तर डोळ्यावर पानांचा लेप लावावा.

## फॉर परफेक्ट पाऊट

सेल्फी पॉईंट

सेल्फीच्या या जमान्यात पाऊटची संकल्पना झपाट्याने लोकप्रीय झाली. परफेक्ट पाऊटसाठी सगळ्यांनाच अँजलिना जोली किंवा प्रियांका चोप्रासारखे मोठे ओठ हवे असतात. सर्जरी न करताही मेक अप ट्रिक्सच्या साह्याने हा लूक मिळवता येतो. ✽ ओठांवर कन्सिलर लावा आणि ते लिप लाईनपर्यंत पसरवा. यामुळे ओठ मोठे, भरीव दिसण्यास मदत होईल.✽ ओठांबाहेरच्या डीप कटला क्यूपिड बो म्हणतात. लिप लायनरच्या साह्याने हा हायलाईट केल्यास ओठ जाडसर दिसण्यास मदत होते. ✽ओठ जाड दिसण्यासाठी न्यूड शेड्सना प्राधान्य द्या. लाईट कलर किंवा पीच शेड्समधील लिपस्टीपमुळे किंवा दोन न्यूड शेड्स एकाच वेळी शेडिंग करून लावल्याने ओठ जाड दिसण्यास मदत होते. डार्क शेड्समुळे ओठ बारीक दिसतात. ✽ ओठ जाडसर भासवण्यासाठी लिप ग्लॉसचा वापर उपयुक्त ठरतो. बाहेरच्या आऊटलाईनपर्यंत ग्लॉस पसरवल्यास ओठांचं सौंदर्य खुलतं.

## पंचांग

**सोमवार, ७ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु.१०, नक्षत्र : आश्लेषा
चंद्रराशी : कर्क, योग : धृती
सूर्योदय: ६.३०, सूर्यास्त: ६.५२

## फॉरवर्डस

**ज्याला आपली किंमतही नाही अशासाठी आपण संपूर्ण आयुष्य घालवतो...**

मेरी उम्र उसके ख्याल में गुजरी,
मेरा ख्याल जिसे
उम्र भर ना आया...

## वाचा तर खरं

✽ पाळीव प्राण्याला एकाच वेळी खूप खायला देऊ नका. त्यांच्यासाठीचे खाद्यपदार्थ बाहेर ठेवा. ✽ फोल्ड होणारी पाण्याची बाटली तसंच खाण्यासाठी बाऊल सोबत ठेवा. ✽ पाळीव प्राण्याचं तोंड आणि पंजे स्वच्छ करण्यासाठी डॉग वाईप्स सोबत ठेवा. ✽ प्राण्याला झोपण्यासाठी गुंडाळायचे मॅट्स कॅरी करता येतील. ✽ प्राण्यांसाठीची औषधं सोबत ठेवा. ✽ विमान प्रवासादरम्यान पाळीव प्राणी सोबत असतील तर काही नियम तसंच अटींची पूर्तता करावी लागते. त्याकडे लक्ष द्या. ✽ प्राण्याचं आवडतं खेळणं किंवा त्याला आवडणारी एखादी वस्तू सोबत ठेवा.

## विज्ञानशाखेतील संधी

करिअरवाटा

सामान्य माणसाच्या जीवनावर विज्ञानाचा फार मोठा प्रभाव असतो. आता तो प्रकर्षाने जाणवू लागल्यामुळे बरेच लोक या शाखेच्या अभ्यासाकडे वळले आहेत. विज्ञान प्रसार करणाऱ्या संस्था, विज्ञानाशी संबंधित पुस्तकांची निर्मिती करणारे प्रकाशक, पत्रकारिता आदी क्षेत्रात या क्षेत्रातील जाणकारांची गरज भासत आहे. नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन (एन.सी.एस.टी.सी.) या संस्थेने सायन्स कम्युनिकेटर्ससाठी अनेक अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. केंद्र सरकारच्या विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयाच्या मदतीने हा अभ्यासक्रम विकसित केला गेला. या क्षेत्रामध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कोणताही एक अभ्यासक्रम पूर्ण करता येऊ शकतो. या संस्थेने दोन आठवड्याच्या अत्यल्प काळाच्या अभ्यासक्रमापासून पदव्युत्तर शिक्षणानंतरच्या पीएच.डी. डिग्रीपर्यंतचे अभ्यासक्रम योजले आहेत. ते पूर्ण केल्यानंतर सायन्स सेंटर्स, सायन्स म्युझियम्स आणि प्रदर्शने, निरनिराळ्या टी.व्ही. वाहिन्या, विज्ञानविषयक नियतकालिके, दैनिके किंवा विज्ञानाशी संबंधित इंटरनेटवरील संकेतस्थळे इत्यादी ठिकाणी काम करता येतं. इच्छुकांनी याचा लाभ घ्यायला हवा.



## काय लिहितो?

खेचाखेची

**निवृत्त मित्राला:** तू दुपारी काय करतोस?
**निवृत्त मित्र:** घरातली कामं संपली की लेखनकार्यात गुंतवून घेतो स्वतःला.
**निवृत्त मित्राला:** काय लिहितोस?
**निवृत्त मित्र:** नाईस पिक, नाईस डीपी, ब्युटिफुल, गॉर्जस, वॉव, हॅपी बर्थ डे, अभिनंदन, विवाह दिवसाच्या शुभेच्छा, भावपूर्ण श्रद्धांजली आणि असं बरंच काही...

## वेगळं काही

आफ्रिकेतल्या सोमालीलँड या देशात चक्क नोटांचा बाजार भरतो. १९९१ मध्ल्या अंतर्गत युद्धानंतर सोमालिया या देशापासून एक भाग वेगळा झाला. सोमालीलँड असं या देशाचं नाव. या देशाची अवस्था अत्यंत बिकट आहे. इथे प्रचंड बेरोजगारी आहे. लोकांना बऱ्याच हालअपेष्टांना सामोरं जावं लागत आहे. शिलिंग हे या देशाचं चलन आहे. पण या चलनाला कोणतंही मूल्य नाही. साधा ब्रेड खरेदी करण्यासाठी नागरिकांना पोत्यामध्ये नोटा भरून न्याव्या लागतात. सोमालीलँडच्या बाजारपेठेत एक अमेरिकन डॉलरच्या बदल्यात ९००० शिलिंग मिळतात. या देशात सोन्याचा छोटासा हार खरेदी करायचा असला तरी १० ते २० लाख शिलिंग खर्च करावे लागतात.

## चेहऱ्याचा रंग उजळण्यासाठी...


ब्युटी टिप्स

१) पपईचा एक तुकडा किसून त्याची पेस्ट तयार करून चेहऱ्यावर लावावी. एक तासापर्यंत ती पेस्ट चेहऱ्यावर ठेवावी. त्यानंतर चेहरा धुवून घ्यावा. हा उपाय नियमित केल्याने चेहऱ्याचा रंग नक्की उजळेल.



२) नारळाचे पाणी चेहऱ्यावर दिवसातून दोन वेळा लावल्याने चेहऱ्यावरील डाग आणि सूरकुत्या कमी होण्यास मदत होईल. ३) पिकलेली केळी थोड्या पाण्यात मिक्स करून घ्यावी. ते मिश्रण चेहऱ्यावर लावून २०-२५ मिनिटे ठेवावे. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावा. ४) त्वचा उजळण्यासाठी गुलाब पाणी दुधात मिक्स करून लावावे. ५) कोरफडीचा वापर केल्याने चेहरा गोरा, स्वच्छ आणि ओलसर राहील. किमान अर्धा तास जेल चेहऱ्यावर लावावे. ६) साखर लिंबाच्या रसात मिक्स करून चेहऱ्यावर स्क्रब करावं. त्याने चेहऱ्यावरील डेड स्किन निघून जाईल. ७) सूर्यफुलाच्या बिया रात्रभर भिजत ठेवून सकाळी हळद आणि केसर टाकून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. ती पेस्ट २० मिनिटे चेहऱ्यावर लावल्याने त्वचेचा रंग उजळण्यास मदत होईल.

# शब्दकोडे क्रमांक १९१५



**आडवे शब्द :-**
१) दैववान,
५) वेडावाकडा
८) मेहेरबानी
१०) पाठविलेला
११) अबोलीची माळ
१३) धपाटा
१५) आयुष्य
१६) इमारतीचे बांधकाम करणारा राज
१८) पोष्टऑफिस
१९) उष्ण वा थंड नसलेले (पाणी)
२०) पुष्पदल
२१) वाघूळ
२२) षट
२३) मुस्लीम सरदार
२४) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
२६) इंग्रजीत भाजणे
२७) गाढव
२८अ) कणीदार
३०) लवंडणे
३२) एक कंदमूळ
३३) छोटी लढाई
३४) व्रत
३६) मगज
३७) लाकडी जिना
३८) ढोंगी, नट, बहुरुपी
४०) धरा, पकडून ठेवा
४३) वाळवी
४५) दया
४६) लक्ष्मी
४८) बासरी
५०) साठ मिनीटे
५२) कपडालत्ता
५४) आत्याचा मुलगा
५५) शूर पुत्राला जन्म देणारी आई
५७) पृथ्वी
५८) खेळ, क्रीडा
६०) धैर्य, हिंमत
६२) सूर्याचे एक नाव
६३) फुरसत
६४) ✽✽ गण ✽✽
६७) शेतीतील काम
६९) फलक, टोपली
७०) हार
७१) मृत्यू नसलेला
७२) शेतकरी
७४) न्याय
७५) रत्न
७६) खलातील कुटण्याचे साधन

**उभे शब्द :-**
१) पुरुष
२) महाराष्ट्राचा राजा
३) नकली, खोटे
४) पर्वत
५) वाहणारी हवा
६) प्रेत वाहण्याची ताटी
७) ओटा
९) सुरळीत चालू असलेले काम बंद पाडणे (वा.प्र.)
१२) चकचकीत
१४) पुष्पदल
१७) नमस्कार
१८) हातोहात, त्वरेने
१९) दोन मैलाचे अंतर
२०) अलगुजे
२१) एक चतुर्थांश
२३) आकाश
२४) मळलेला
२५) दया, कीव
२६) न घाबरणारा
२८) टोळेचा प्रमुख
२९) श्रीविष्णुचा बटु अवतार
३१) पायाने अधू असलेला
३२) गाणे गाणारा
३३) उसाचा रस काढणारे यंत्र
३५) सर्प
३९) पोपट
४१) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
४२) दरवाजा
४४) अखेरीस
४७) एक सुगंधी वनस्पती
४८) पाप करण्यास घाबरणारा
४९) आई, ज्ञानेश्वर
५१) संतोष, आनंद
५३) पंख
५६) ताल वृक्ष
५९) लाजणारा
६१) सुरक्षित
६२) सुपारी कातरण्याचे साधन
६३) समतल
६५) दृष्टी
६६) मेलेला
६८) फळातील खाद्य
७०) पाय कवितेतील चरण
७३) अभिनेता

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# गजानन महाराज पतसंस्थेस ४५ लाखांचा नफा : गायकवाड



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** येथील अग्रगण्य श्री गजानन महाराज नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२५ आर्थिक वर्षाअखेर निव्वळ नफा ४५ लाख ४२ हजार इतका झाल्याची माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन बापूसाहेब गायकवाड यांनी दिली.

सन २०२४-२५ आर्थिक वर्षात सभासद संख्येत वाढ होऊन २११० इतकी झाली आहे, तसेच संस्थेच्या सर्व प्रकारच्या ठेवी आणि निधींमध्ये भक्कम आर्थिक स्थिती असून, संस्थेचा निव्वळ एनपीए शून्य टक्के इतका झाला असल्याचे त्यांनी सांगितले. आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामकाजाबद्दल संस्थेला सहकार प्रेरणा गौरव पुरस्कार मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, यांच्या हस्ते प्राप्त झाला आहे.

पंचवटी परिसरातील भाजीपाला विक्रेते, लघु व्यावसायिक, महिला, होतकरू तरुण यांना वैयक्तिक कर्ज, वाहन कर्ज, विमा पॉलिसी तारण, सोने तारण कर्ज, गृह कर्ज अशा विविध कर्ज योजनांच्या माध्यमातून एकूण कर्ज २४ कोटी १ लाखाचा पतपुरवठा केला आहे. कर्जाची सुरक्षितता म्हणून कर्जाचे वितरण करतेवेळी पुरेशा रकमेचा कर्जदाराचा विमा हा उतरवला जातो. संस्थेतील कर्मचारी वर्गास सेवा नियम, विमा संरक्षण लागू केल्यानंतर वातानुकूलित, प्रशस्त व एखाद्या कॉर्पोरेट बँकेच्या धर्तीवर कर्मचाऱ्यांना चालू वर्षापासून ब्लेजर गणवेश लागू केला असल्याचे चेअरमन यांनी सांगितले.

संस्थेच्या कामकाजात व्हाईस चेअरमन सोमनाथ फलाणे, सेक्रेटरी आत्माराम मुरकुटे, जनसंपर्क संचालक दिलीप लवटे, संचालक योगेश फटांगरे, रवींद्रकुमार गायकवाड, देवीदास गायकवाड, तानाजी गायकवाड, संचालिका शोभा साळुंके, शोभा पाटील, आदींनी सहभाग घेतला. नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले यांच्यासह फेडरेशनचे इतर सहकारी संचालकांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याचे सांगत बापूसाहेब गायकवाड यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

सोमवार
७/४/२०२५
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| २ | ४ | ९ |
| १२९ | १४९ | २८९ |
| ३९० | २६६ | ४६९ |
| २४ | ४६ | ९१ |
| २६ | ४८ | ९३ |

सोमवार
७/४/२०२५
मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| १ | ५ | ७ |
| १४६ | १४० | ३४० |
| ३८० | २५८ | १३३ |
| १५ | ५७ | ७३ |
| १७ | ५९ | ७५ |


## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# गुरुशिष्य जयंती उत्सव कार्यालयाचे उद्घाटन

**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी)** :- येथील जाणता राजा मैदान, अशोकनगर येथे कार्यालयाचे उद्घाटन ज्योती जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांच्या हस्ते, तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष प्रवीण नागरे, कार्याध्यक्षा नीलिमा जेजुरकर, उपाध्यक्ष बाळासाहेब भोजने, उपाध्यक्ष जान्हवी तांबे, सरचिटणीस काळू काळे, चिटणीस सोनाली भंदुरे, सचिव अश्विन महाजन, प्रसिद्धिप्रमुख तुषार ढेपले तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष गजानन शेलार, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे, करण गायकर, माजी नगरसेवक सुरेश भंदुरे, योगेश शेवरे, रवींद्र धिवरे आदींसह जनरल माथाडी कामगार संघटनेचे चिटणीस दीपक लोंढे, सामाजिक कार्यकर्ते गोकुळ निगळ, दिनकर कांडेकर, जुनेद शेख, शरद शिंदे, ॲड. प्रशांत जाधव, किशोर मुंदडा, दिलीप भंदुरे, विजय भंदुरे, बाळासाहेब जाधव, नरेश सोनवणे,अशोक पारखे, नितीन निगळ, भिवानंद काळे, सुनील मौले, नाना वाघ, ॲड. महेंद्र शिंदे, रामदास मेदगे, तसेच सातपूर शिवजन्मोत्सव समिती २०२५ अध्यक्ष जीवन रायते, माजी अध्यक्ष जी.एस. सावळे, सचिन गांगुर्डे, किशोर निकम, मुन्ना तुपे, देवा जाधव, रवींद्र देवरे, पंकज निकम, दीपक वाघचोरे, भगवान काकड, आकाश पवार, राजू पाटील, गौरव जाधव, दीपक आरोटे, हेमंत नागरे, योगेश गांगुर्डे, गोविंद माळी, गुलाब माळी, भय्या क्षीरसागर, दिलीप महाजन, महेश नेमाडे, देवेंद्र निकम, जगदीश पाटील, मधुकर माळी, रावसाहेब अहिरे, दीपक निर्वाण, जितेंद्र पाटील, ज्ञानेश्वर माळी, अमोल जाधव, रवी महाजन, कैलास सानप, क्रांती पालवे, सूरज ठोंबरे, सातपूर भीमजन्मोत्सव समितीच्या स्वागत अध्यक्षा माया काळे, वृषाली सोनावणे, गीता जाधव, रोहिणी जोशी, कल्पना पाटोळे, रोहिणी देवरे, लक्ष्मी नागरे, पूनम नागरे, स्वप्ना माळी, समितीचे समन्वयक प्रकाश महाजन, श्रीराम मंडळ, मच्छिंद्र माळी, पोपटराव जेजुरकर, भारत जाधव, अनिल माळी, राहुल साळुंखे, प्रकाश खैरनार, दीपक गांगुर्डे, शिवाजी काळे, हेमंत शिरसाठ, मनोज तांबे, अशोक मंडलिक, दिनेश चव्हाण, हर्षल मोरे, गोकुळ तिडके, तुषार भंदुरे, दयाराम माळी शशिकांत सोनवणे, पवन दोंदे आदी उपस्थित होते.



# स्वस्त धान्य दुकानदारांनी लाभार्थ्यांची काळजी घ्यावी : डॉ. मिलिंद कुलकर्णी

**देवळा (भ्रमर वार्ताहर)** :- शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना कर्मचाऱ्यांनी ग्राहक समजून सेवा द्यावी, स्वस्त धान्य दुकानदारांनी मर्यादित दिवस धान्य वाटप न करता जास्तीत जास्त दिवस धान्य वाटप करून कोणी लाभार्थी वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, तसेच दुकानाच्या दर्शनी भागात धान्याचे नमुने ठेवावेत, अशी सूचना तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी यांनी जागतिक ग्राहक दिनानिमित्त झालेल्या बैठकीत केली.




यावेळी ग्राहक दिनास अनुपस्थित असलेल्या शासकीय विभागांचा देवळा तालुका ग्राहक पंचायतीच्या वतीने निषेध करण्यात आला. यावेळी जागतिक वनदिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

फसवणूक झालेल्या ग्राहकांना तक्रार देण्यासाठी संपर्क साधणे सुलभ होण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. येथील नवीन प्रशासकीय कार्यालयाच्या सभागृहात तहकूब करण्यात आलेला जागतिक ग्राहकदिन तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी देवळा तालुका ग्राहक पंचायतीचे संघटक संजय मांडगे, सहसंघटक संजय देवरे, सचिव संजय भदाणे, बंडू जोशी, बाबा पवार, राजपाल आहिरे, शशिकांत चितळे, सचिन आहेर, चंद्रकांत भदाणे, मोबिन तांबोळी आदी ग्राहक मंचचे सदस्य उपस्थित होते.

संजय देवरे यांनी आपल्या प्रास्ताविकात ग्राहक पंचायतीचे महत्त्व विशद केले, ग्राहकाने फसवणूक झाल्यानंतर तक्रार केल्यावर संबंधित विभागाकडून वेळेवर कारवाई होत नसल्यामुळे तक्रार करण्यास ग्राहक पुढे येत नाहीत, ही बाब निदर्शनास आणून दिली, तसेच विविध विभागांकडून ग्राहकांना येणाऱ्या समस्या मांडल्या. सध्या ऑनलाईन फसवणूक होण्याच्या घटना सातत्याने वाढत आहेत. यासाठी कोणतीही कार्यक्षम यंत्रणा नसल्यामुळे अनेक ग्राहक नाडले गेले आहेत.

यासाठी तालुक्यात सक्षम यंत्रणा उभी करण्याची मागणी ग्राहक पंचायतीने केली. बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखाधिकारी स्वप्नील भामरे यांनी कोणत्याही ऑनलाईन स्कीमला बळी न पडता प्रत्यक्ष बँकेत संपर्क साधण्याचे आवाहन केले.

तालुका कृषी अधिकारी सीताराम पाखरे यांनी सर्व योजना या ऑनलाईन असल्यामुळे त्यात पारदर्शकता असून त्यात बाहेरून कोणालाही हस्तक्षेप करता येत नसल्याची ग्वाही दिली.

डॉ. मिलिंद कुलकर्णी यांनी मार्केटिंग, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती यामुळे ग्राहकांची फसवणूक होण्याच्या घटना वाढत असून, ग्राहक संरक्षण कायद्याविषयी ग्राहकांना फारशी माहिती नसल्याने फसवणूक झाल्यावर काय करावे? याबाबत असलेल्या अज्ञानामुळे तक्रार करण्यास ग्राहक पुढे येत नाही, तसेच ग्राहकांना उत्पादन व बाजारपेठेबाबत साक्षर करण्यात ग्राहक पंचायत मोलाची भूमिका बजावू शकते, असे प्रतिपादन केले. यावेळी जागतिक वनदिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. बैठकीस नायब तहसीलदार बबन आहिरराव, गटविकास अधिकारी राजेश कदम, तालुका कृषी अधिकारी सीताराम पाखरे, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष जाधव, दुय्यम निबंधक राजू शिंदे, पुरवठा निरीक्षण अधिकारी शारदा गावंडे, महाराष्ट्र बँकेचे शाखाधिकारी स्वप्नील भामरे, खर्डे येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेंद्र पवार, वीज वितरण कंपनीचे सुनील कुमावत, पेट्रोल पंपचालक अशोक आहेर आदींसह स्वस्त धान्य दुकानदार व नागरिक उपस्थित होते. देवळा शहरातील मुद्रांक विक्रेते ग्राहकांना मुद्रांक देण्यास टाळाटाळ करीत असल्याच्या ग्राहकांच्या तक्रारी आहेत. दुय्यम निबंधक राजू शिंदे यांनी मुद्रांक विक्रेत्यांना पत्र देऊन याबाबत कडक ताकीद देणार असून, अडवणूक करणाऱ्या मुद्रांक विक्रेत्याबाबत त्यांच्याशी संपर्क करण्यास सांगितले. दुय्यम निबंधक कार्यालय पहिल्या मजल्यावर असल्यामुळे या कार्यालयात येणाऱ्या अपंग, रुग्ण व वृद्धांना कार्यालयात न बोलावता तळमजल्यावरच सेवा देणार असल्याचे आश्वासन दिले.

# व्यवसायाच्या वार्षिक विवरणपत्राचे निर्धारण करून घेण्याचे मनपाकडून आवाहन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिका हद्दीतील व्यवसायाचे वार्षिक विवरण पत्राचे निर्धारण करून घेऊन नाशिक मनपास सहकार्य करावे व ज्यांनी वार्षिक विवरणपत्र सादर केलेले नाही, अशा व्यापारी, उद्योजक यांनी वार्षिक विवरणपत्रे सादर करून या विवरणपत्राचे निर्धारण करून घ्यावे, असे आवाहन नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री व नाशिक मनपा कर विभागाचे उपायुक्त अजित निकत यांनी केले आहे.

शासनाकडील अधिसूचनेनुसार दि. २२ मे २०१३ पासून नाशिक महानगरपालिका हद्दीत स्थानिक संस्था कर अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती; तथापि शासनाच्या अधिसूचनेनुसार दि. ३१ जुलै २०१५ रोजी स्थानिक संस्था कर बंद करून दि. १ ऑगस्ट २०१५ पासून ज्या व्यापारी, उद्योजक यांची उलाढाल ५० कोटी व त्यावरील आहे. अशा व्यापारी, उद्योजक यांनाच स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला होता. तथापि दि. १ जुलै २०१७ पासून संपूर्ण देशात वस्तु व सेवा कराची अंमलबजावणी करण्यात आली.

त्यामुळे स्थानिक संस्था कर हा बंद करण्यात आला आहे. शासनाकडील दि. २४ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानुसार दि. ३० एप्रिल २०२५ पासून सर्व महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर विभाग बंद करण्याबाबत कळविले आहे. ज्या व्यापारी, उद्योजक यांनी स्थानिक संस्था कर लागू झाल्यापासून स्थानिक संस्था कराची नोंदणी स्थानिक संस्था कर विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे केली आहे अशा व्यापारी, उद्योजक यांनी त्यांच्या व्यवसायाचे सन २०१३-१४ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे विवरणपत्र सादर केलेले आहे; परंतु त्यांनी भरलेला स्थानिक संस्था कर योग्य आहे, याची खात्री करण्यासाठी अनुषंगिक कागदपत्रे सादर करून पडताळणी करणे आवश्यक आहे.

शासनाकडील दि. २४ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानुसार दि. ३० एप्रिल २०२५ पासून सर्व महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर विभाग बंद करण्याबाबत कळविले असून, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नोंदणी धारक व्यापारी, उद्योजक यांना आवाहन करण्यात येते, की त्यांनी सादर केलेल्या वार्षिक विवरण पत्रासोबत भरलेला स्थानिक संस्था कर बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करण्याकरिता, निर्धारण करण्यासाठी लागणारी सर्व आवश्यक ती अनुषंगिक कागदपत्रे व ज्या नोंदणीधारकांनी अतिरिक्त भरलेला स्थानिक संस्था कराचा परताव्याबाबतची सर्व कागदपत्रे, तसेच नोंदणीधारकांचे बँक खाते लिंक केलेले आहे, अशा नोंदणीधारकांनी कागदपत्रांची पूर्तता स्थानिक संस्था कर विभाग, नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, तळमजला, शरणपूर रोड येथे करावी.

तसेच आपल्या व्यवसायाचे वार्षिक विवरणपत्राचे निर्धारण करून घेऊन नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे व ज्यांनी अद्यापपावेतो वार्षिक विवरणपत्र सादर केलेले नाही, अशा व्यापारी, उद्योजक यांनी वार्षिक विवरणपत्रे सादर करून सदर विवरणपत्राचे निर्धारण करून घ्यावे, असे आवाहन नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री व मनपा कर विभागाचे उपायुक्त अजित निकत यांनी केले आहे.

# राजस्थान येथे पांढरपेशा गुन्हेगाराला गुंडाविरोधी पथकाने केले जेरबंद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक शहरातील गुंडाविरोधी पथकाने राजस्थानच्या सिकर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका पांढरपेशा गुन्हेगाराला अटक केली. बँकेत बनावट कागदपत्रे सादर करून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणारा आरोपी शकूर अहमद जमालुद्दीन सय्यद याच्यावर आय. एस. इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड बिल्डकॉन प्रा. लि. या कंपनीला मोठ्या रकमेची फसवणूक करून आपले इमोर्टल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीत त्या रकमेसह घोटाळा केल्याचा आरोप आहे.

फिर्यादी पंकजकुमार आनंदकुमार ठाकूर यांच्या कंपनीने आडगाव-निफाड-औरंगाबाद या रस्त्याचे बांधकाम केले होते, ज्यामुळे संबंधित नुकसानभरपाईची रक्कम १२.६१ कोटी रुपये बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने बँकेत सादर केली गेली. यावरून सरकारवाडा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदविला गेला आणि आरोपी फरारी झाला. त्याला अटक करण्यासाठी नाशिक पोलिसांनी मोठा प्रयत्न केला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशावरून गुंडाविरोधी पथकाने आरोपीचा मागोवा घेणे सुरू केले.



गुंडाविरोधी पथकाच्या प्रभारी अधिकाऱ्यांना माहिती मिळाली, की आरोपी शकूर सय्यद हा इंदूर येथून सिकर जिल्ह्यात पळून गेला आहे. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्या अनुषंगाने या गंभीर स्वरूपातील गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध घेत असताना गुंडाविरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते यांनी मिळालेल्या माहितीनुसार रोजी सिकर येथे पोलीस पथकाने मानवी व तांत्रिक कौशल्य वापरून आरोपी शकूर सय्यद (वय ६०, रा. फ्लॅट नं. ११, यश अपार्टमेंट, धामणकर चौक, तिडके कॉलनी, नाशिक) यास शिताफीने ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी नाशिक येथे आणून आर्थिक गुन्हे शाखा, नाशिक शहर यांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते, पोलीस अंमलदार विजय सूर्यवंशी, प्रदीप ठाकरे, अक्षय गांगुर्डे, राजेश राठोड आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली.




श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी सुरेश गांगुर्डे यांची सर्वानुमते एकमताने निवड करण्यात आली. त्याप्रसंगी सत्कार करताना माजी नगरसेविका अलका अहिरे व कैलास अहिरे, तसेच सर्व कार्यकारिणी व समस्त शेकडो ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# नाणेगाव बस सेवा पुन्हा सुरू करण्याची शिवसेनेची मागणी

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाणेगाव बस सेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी शिवसेनेने केली असून, यामुळे विद्यार्थी, कामगार, दूध उत्पादक आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी यांनी सांगितले.

नाशिक सहकारी साखर कारखाना गेल्या आठ वर्षांपासून बंद अवस्थेत होता. त्यामुळे बंगाली बाबापासून कार्यस्थळावर जाणारा रस्ता अत्यंत खराब झाला होता. याच मार्गावरून नाणेगाव आणि वडगाव या भागांसाठी एस. टी. महामंडळाची बस सेवा गेली २५ वर्षे सुरू होती; मात्र रस्त्याची दयनीय अवस्था, कारखाना बंद पडल्याने कॉलनीतील कुटुंबांचे विस्थापन आणि नागरिकांची वर्दळ कमी झाल्यामुळे ही बस सेवा बंद करण्यात आली होती.

आता मात्र हा रस्ता पूर्णतः डांबरीकरण व काँक्रिटीकरण करून सुधारण्यात आला आहे. तसेच, या भागात विविध उद्योग आणि वसाहती स्थापन झाल्याने मोठ्या प्रमाणात नागरिकांनी वास्तव्य सुरू केले आहे. परिणामी, सकाळी दूध उत्पादक, भाजीपाला उत्पादक शेतकरी, औद्योगिक व शासकीय कामगार, तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शहराकडे जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर, एस. टी. महामंडळाने बंद पडलेली नाणेगाव बस सेवा त्वरित सुरू करावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत रस्ता सुरळीत असून, बस सेवा पुन्हा सुरू केल्यास नागरिकांसाठी प्रवास सोयीस्कर होईल. प्रस्तावित मार्ग नाणेगाव नाशिक सहकारी साखर कारखाना, सोमायानगर, बंगाली बाबा, पळसे, चेहेडी, सिन्नर फाटा, नाशिकरोड, बिटको, देवळाली गाव, विहितगाव, भाटिया कॉलेज, भगूर, नाणेगाव असा ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या मागणीसाठी आगार व्यवस्थापक उमेश बिरारी यांना निवेदन दिले. यावेळी पळसे गावचे गटप्रमुख पांडुरंग ढेरिंगे, प्रल्हाद गायधनी, ज्येष्ठ पत्रकार नंदू नरवाडे, राजू नरवडे, विशाल शिंदे, साहेबराव सरोदे, संजय गायधनी, देवीदास गायधनी, योगेश सरोदे, दत्ता सरोदे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील खासगी बाजार समितीतून कांद्याचा पहिला कंटेनर दुबईला रवाना

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- जिल्ह्यातील कसमादे खासगी कृषी उत्पन्न बाजार समिती सटाणा येथून दुबईसाठी शेअर किंग प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक तरुण युवा उद्योजक विशाल पांगरकर यांचा कांद्याचा पहिला कंटेनर श्रीफळ वाढवत रवाना झाला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश पवार, भारत क्रांती मिशन मुख्य समन्वयक, छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विलास पांगारकर, मराठा क्रांती मोर्चा संभाजीनगर व भारत क्रांती मिशनचे समन्वयक विजय काकडे-पाटील, अमोल काकडे, आंतरराष्ट्रीय व्यापार अभ्यासक श्रीकांत भांडारकर, नंदू पाटील, सतीश पाटील, अमोल पाटील, टकले, विजय नन्नावरे, अमोल सोनवणे आदी उपस्थित होते.

मराठी तरुण उद्योजकांनी अशा प्रकारे शेतीविषयक उद्योगांमध्ये येऊन भरभराटी करून साता समुद्रापार आपला उद्योग-व्यवसाय वाढावा, अशी सदिच्छा डॉ. विलास पांगारकर यांनी दिली.

# नाशिकचे युनायटेड विरुद्ध पहिल्या डावातील आघाडीचे गुण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- येथे होत असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय १९ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेच्या (एमसीए इन्विटेशन लीग), दोन दिवसीय कसोटीच्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लबवर झालेल्या अनिर्णीत सामन्यात नाशिकने युनायटेड विरुद्ध पहिल्या डावातील आघाडीचे गुण घेतले. कर्णधार समकित सुराणाने अष्टपैलू कामगिरी करीत नाबाद शतक झळकावले व सामन्यात ७ बळी घेत अष्टपैलू कामगिरी केली.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना युनायटेडने सर्वबाद २२७ धावा केल्या. किनशुक भारतीने नाबाद १०० धावा केल्या. नाशिकच्या कर्णधार समकीत सुराणाने ४, तर कृष्णा केदारने ३ बळी घेतले. उत्तरादाखल ३ बाद ६ व ६ बाद ७६ अशा खराब अवस्थेतून पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करताना डावखुऱ्या समकित सुराणाने कर्णधाराची खेळी करत १८ चौकार व १ षटकारासह नाबाद दमदार १११ धावा केल्या व त्या जोरावर नाशिकने ९ बाद २६७ धावा करून युनायटेडवर पहिल्या डावात आघाडी घेतली.

समकितला व्यंकटेश बेहरे ३९ व ज्ञानदीप गवळी ३६ यांची साथ मिळाली. युनायटेडच्या यश बोरकरने ५ बळी घेतले. सामना संपेपर्यंत दुसऱ्या डावात युनायटेडने ५ बाद १०३ धावा केल्या. समकित सुराणाने ३ बळी घेतले.

इतर दोन सामन्यांत एमसीसी, म्हसरूळ मैदानावर डीव्हीसीए विरुद्ध नंदुरबार सामन्यात, डीव्हीसीएने देव वेद १३२ व ओम पाटील ११० यांची शतके व वरद छट्टरच्या ७ बळींच्या जोरावर नंदुरबारवर १ डाव व १५५ धावांनी मोठा विजय मिळवला, तर संदीप फाऊंडेशनच्या मैदानावर सातारा विरुद्ध उस्मानाबाद सामन्यात साताराने उस्मानाबादवर आठ गडी राखून विजय मिळवला. साताराच्या संग्रामसिंह नारळेने ६९ धावा व श्रावण खाडेने डावात पाच बळी, तर उस्मानाबादच्या गौरव लंगोटेने डावात आठ बळी घेतले व अनुदीप देवलकरने ५६ धावा केल्या.

# सातपूर परिसरात घंटागाडीची अनियमितता; नागरिक संतप्त

**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी)** :- परिसरात घंटागाडीच्या अनियमितपणामुळे कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून, यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. घंटागाडी नियमित करण्यासाठी मनपा प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी महिलांनी केली आहे.

सातपूर परिसरात ठिकठिकाणी घंटागाडी दिवसाआड येत असल्याने कचऱ्याची समस्या निर्माण होत आहे. नेहमीप्रमाणे घंटागाडी येणार असल्याचे गृहीत धरून महिला घरातच कचरा साठवून ठेवतात; मात्र दररोज येणारी घंटागाडी न आल्यामुळे घरातच साचून ठेवलेल्या ओल्या कचऱ्यामधून दुर्गंधी पसरत आहे. कचरा कुठे टाकावा, असा प्रश्न निर्माण होत असल्याने अनेक नागरिक कचरा रस्त्यावर कचरा टाकणे पसंत करतात. त्यामुळे सातपूर परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहे. स्वच्छ नाशिक सुंदर नाशिक ठेवण्यासाठी महापालिकेने घंटागाड्या सुरळीत करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे

सातपूर परिसरात एक दिवसाआड घंटागाडी येत असल्यामुळे दोन दिवस कचरा घरात राहत असल्याने जंतू निर्माण होत आहेत. घंटागाडी पुढे पुढे जाते. महिला लांबपर्यंत घंटागाडीच्या मागे पळत जाऊन कचरा टाकत असतात.

# नाशिक येथील परिवर्त परिवारातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- येथील परिवर्त बहुउद्देशीय संस्थेतर्फे दरवर्षी राज्यस्तरावर लोकप्रबोधन, संशोधनपर लेखन आणि उत्कृष्ट काव्यनिर्मितीला सन्मानित केले जाते.







या वर्षीच्या सन्मानार्थींची घोषणा संस्थेचे अध्यक्ष प्रा. गंगाधर अहिरे, सचिव प्राचार्य दिनकर पवार व समन्वयक कवी अमोल बागूल यांनी आहे. महाकवी वामनदादा स्मृती 'वादळवारा' पुरस्कार प्रसिद्ध शाहीर प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे (मुंबई) यांना प्रदान करण्यात येणार आहे.

चंदनशिवे हे परिवर्तनवादी लोकगीते व आंबेडकरी शाहिरीचे अभ्यासक असून, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख आहेत, त्यांचे 'लोककला परंपरेचे शिल्पकार' हे पुस्तकही प्रकाशित आहे. ११ हजार रुपये रोख, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. निवड समितीत रमेश जगताप, अमोल बागूल आणि उद्धव गांगुर्डे यांचा समावेश होता. कवी अरुण काळे स्मृती 'अजातशत्रू' काव्य पुरस्कार कवी प्रशांत वंजारे (आर्णी, ता. यवतमाळ) यांच्या 'आम्ही युद्धखोर आहोत' या कवितासंग्रहाला प्रदान केला जाणार आहे. निवड समितीत अरविंद सुरवाडे, प्रा. गंगाधर अहिरे आणि रखमाजी सुमारे यांचा सहभाग होता. पाच हजार रुपये रोख, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे प्रस्तुत पुरस्काराचे स्वरूप आहे. कालकथित राजा ढाले स्मृती वैचारिक संशोधनपर लेखन सन्मान, प्रा. महेंद्र भवरे (मुंबई) यांच्या 'फुले-आंबेडकरी वाङ्मयकोश' या संशोधनपर ग्रंथाला दिला जाणार आहे. त्यांचे इतरही ग्रंथ प्रकाशित आहेत. पाच हजार रुपये रोख, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह असे सदर पुरस्काराचे स्वरूप आहे. नितीन भुजबळ, डॉ. धीरज झाल्टे व करुणासागर पगारे यांचा निवड समितीत सहभाग होता. यावेळी ॲड. अशोक बनसोडे, डॉ. संजय जाधव, चंद्रकांत गायकवाड, काशीनाथ वेलदोडे, किशोर शिंदे व कवी नंदाराम दिवे उपस्थित होते. प्रस्तुत सन्मान नाशिक येथे होणाऱ्या ११ व्या एकदिवसीय परिवर्त मराठी साहित्य परिषदेत मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. संस्थेतर्फे नाशिक जिल्हास्तरावर निवड केलेल्या सामाजिक व वाङ्मयीन क्षेत्रातील पुरस्कारार्थींची घोषणा केली जाणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. गंगाधर अहिरे व नितीन बागूल यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे कार्यालय,
सिंचन भवन परिसर, त्र्यंबक रोड, नाशिक-422002
(दूरध्वनी क्र. (0253) - 2315485 / ई-मेल आयडी : eemid.nashik@gmail.com)

**ई-निविदा सूचना क्र. 11 सन 2024-25**

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम **कंत्राटदारांकडून** खालील कामाकरिता B-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ **http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच** कोणतेही कारण न देता **निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची फी (जीएसटी सह) | काम पूर्ण करण्याचा कालावधी/ ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, सिंचन भवन, नाशिक या कार्यालयाचे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम. | रु. 3,81,83,544/- | रु. 190920/- (To be paid via online gateway Payment mode) | रु. 2000+360 (GST) = 2360/- (ना-परतावा) | 12 महिने (पावसाळ्याचे कालावधीसह) निविदेतील अटी व शर्तींचे पूर्तता करणारे सक्षम कंत्राटदार |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक 07.04.2025 ते 15.04.2025 |
| ई-निविदा उघडणे | दिनांक 16.04.2025 |

**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**
**http://mahatenders.gov.in**
**(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)**

**सही/-**
**(निलेश प्र. पाटील)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग नाशिक**

आरओसी-2025-26/क्र.-5/C६६

# संपादकीय

## ‘दीनानाथ’ नावाला लांच्छन

पुण्यातील प्रसिद्ध हॉस्पिटल, गानकोकिळा लता मंगेशकर यांचे वडील आणि प्रसिद्ध गायक दीनानाथ मंगेशकर यांचे नाव, महापालिकेने करोडो रुपयांची जागा अवघ्या एक रुपया कराराने दिलेली, यासह नागरिक व मान्यवरांकडून अनेक प्रकारच्या सोयी, सवलती, सूट व देणग्या मिळत असलेल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात प्रशासनाच्या मुजोरपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयाने उपचारांसाठी १० लाख रुपये भरण्याची मागणी केली; मात्र त्यांचे कुटुंबीय सध्या तीन लाख रुपये भरतो, उर्वरित पैशांची जुळवाजुळव करतो, तोपर्यंत उपचार सुरू करा, असे सांगत असतानाही सकाळी ९ ते दुपारपर्यंत उपचारच केले नाहीत. वेळेत उपचार न मिळाल्याने त्या गर्भवती तनिषा भिसे नावाच्या महिलेचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे जणू दीनानाथ मंगेशकर आणि लता मंगेशकर यांच्या नावांनाच जणू बट्टा लागला. त्यानंतर आता दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे अनेक कारनामे आणि गोष्टी बाहेर येत आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात महात्मा फुले आरोग्य योजनेचा लाभच मिळत नसल्याची माहिती समोर आली आहे. मंगेशकर हॉस्पिटलने एका रुग्णाला चक्क पेपरवर महात्मा फुले योजनेचा लाभ मिळत नाही, असे लिहून दिले आहे. परशुराम हिंदू सेवा संघाने यावर आक्षेप घेतला आहे. तर सरकारने सर्वसामान्य आणि गोरगरिबांसाठी घोषित केलेल्या योजनेचे काय? असा सवाल आता उपस्थित होत आहे. एवढ्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये महात्मा फुले योजनेचा लाभ मिळत नाही. या योजनेचा मुख्य उद्देश राज्यात गरीब व गरजू लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे आहे, जेणेकरून ते आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणार नाहीत. या योजनेत, रुग्णालयात दाखल होणे आवश्यक असलेल्या गंभीर आजारांसाठी लाभार्थ्यांना कॅशलेस आरोग्य सेवा दिली जाते. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या वंचित गटांना आवश्यक आरोग्यसेवा कव्हर प्रदान करते. पात्रतेमध्ये पिवळे, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा किंवा केशरी रेशन कार्ड असलेली कुटुंबे; पांढरे रेशन कार्ड असलेले १४ संकटग्रस्त जिल्ह्यांतील शेतकरी; आणि अनाथाश्रमातील मुले, महिला कैदी आणि नोंदणीकृत बांधकाम कामगार असे विविध लाभार्थी समाविष्ट आहेत. दहा लाख रुपये हे एका वेळच्या उपचारांची किंमत नाही, तर पुढच्या आठ ते दहा महिन्यांची एकूण फी आहे. त्यामुळे रुग्णालयाला दहा लाख रुपयांचे हप्ते करून देता आले असते; पण एकरकमी दहा लाख रुपये भरण्याचा आग्रह धरून डिलिव्हरीसाठी आलेल्या महिलेवर अनेक तास उपचार न केल्यामुळे तिचा जीव गेला आणि काही क्षणांपूर्वी जगात पदार्पण केलेल्या दोन नवजात मुली आईचे निधन झाल्यामुळे मातृप्रेमाला पारख्या झाल्या, ही हृदयद्रावक घटना आहेच; पण रुग्णालय प्रशासन आणि संचालकांना घटनेच्या गांभीर्याची जाणीव नव्हती, हे दुर्दैव आहे. धर्मार्थ रुग्णालय म्हणून नोंद असलेल्या रुग्णालयात असा अधर्म व्हावा, हे कोणालाही सहन होणे शक्य नाही. त्यातच शुक्रवारी निदर्शने करण्यासाठी आलेल्या कार्यकर्त्यांना अडवल्यामुळे पोलिसांवरही जनतेचा रोष ओढवला आहे, हे योग्य नव्हे.

## भ्रमर शब्दकोडे क्र. २०२

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ६ | | ७ | ■ | ■ |
| | ■ | ८ | | ■ | ९ | | | ■ | १० | ११ | १२ |
| १३ | १४ | | ■ | १५ | | | ■ | १६ | | | |
| १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | | | ■ | |
| | ■ | २० | | | | ■ | २१ | | | २२ | ■ |
| २३ | २४ | | ■ | | ■ | २५ | | ■ | ■ | २६ | २७ |
| ■ | २८ | | २९ | ■ | ३० | | ■ | ३१ | | | |
| ■ | ■ | ३२ | | | | ■ | ३३ | | ■ | ३४ | |
| ३५ | | | | ■ | ■ | ३६ | | ■ | ३७ | | ■ |
| | ■ | | ■ | ३८ | ३९ | | ■ | ४० | | | ■ |
| ४१ | ४२ | ■ | ४३ | | | ■ | ४४ | | | ■ | ४५ |
| ४६ | | | | | ■ | ४७ | | ■ | ४८ | | |

**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील एक प्रमुख नेते व मंत्री २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत सर्वाधिक काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) शिवसंग्रामचे संस्थापक- स्व. **** मेटे १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) प्रदूषण विरहित दुचाकी वाहन, समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या माजी खासदार - **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) माजी खासदार समीर भुजबळ यांचा मतदारसंघ

### शब्दकोडे क्र. २०१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हा | रा | ष्ट्र | ■ | उ | त्त | र | प्र | दे | श | ■ |
| स | र | स | ■ | मा | ता | ■ | स | हा | ■ | ह | र |
| ल | ■ | ■ | का | स | व | ■ | द | र | बा | र | ■ |
| त | फा | व | त | ■ | ळा | ■ | ■ | ■ | रा | ■ | ना |
| ■ | र | सा | ■ | म | न | मो | ह | न | ■ | सी | ता |
| ■ | ■ | ह | त्ती | ■ | व | ■ | य | व | त | मा | ळ |
| प | रा | त | ■ | वा | रा | ■ | ग | रा | ■ | दे | ■ |
| ट | ■ | ■ | वा | ई | ■ | वा | य | ■ | ध | व | न |
| क | ड | क | डा | ट | ■ | स | ■ | स | ब | ■ | र |
| न | र | म | ■ | ■ | ग | रू | ड | ■ | ध | म | क |
| ■ | पो | ल | ■ | पा | र | ■ | ब | ल | वा | न | ■ |
| ए | क | ■ | म | ल | म | ■ | र | स | ■ | न | ऊ |

# मुक्त विद्यापीठाचा द्विपक्षीय शैक्षणिक करार





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने येथील महायान ग्लोबल इक्विपमेंट सोल्यूशन्स प्रायव्हेट लि. सोबत कौशल्याधारित शिक्षणातून रोजगारनिर्मितीसाठी एक महत्त्वाकांक्षी असा द्विपक्षीय शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व अशोका बिल्डकॉनचे अशोक कटारिया यांच्या पुढाकाराने विद्यापीठ मुख्यालयातील सभागृहात हा करार करण्यात आला.

विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव दिलीप भरड व एमजीईएसपीएलच्या वतीने कार्यकारी संचालक नितीन अहिरे यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

प्रारंभी या करारानुसार बांधकाम, खाणकाम व संबंधित यंत्र व इतर सामग्री व्यवस्थापनासंबंधी सहा शिक्षणक्रमांद्वारे व्यवसाय व रोजगाराभिमुख कौशल्य आधारित शिक्षण–प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नाशिक येथे त्यानुसार पहिले प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, अशोका बिल्डकॉनचे अशोक कटारिया, विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, अशोका समूहाचे डॉ. दत्ता गुजराथी, विद्यापीठाचे निरंतर शिक्षण विद्याशाखा, तसेच व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, प्रा. नीलेश ठाकरे, एफसीपी पुणेचे संचालक नीलेश कटारिया व अनुप पिल्लाई, एफसीपी सल्लागार अनिल जोशी, अशोका एज्युकेशनचे सचिव श्रीकांत शुक्ला, विद्यापीठ अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्राचे संचालक डॉ. मधुकर शेवाळे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा संचालक डॉ. सुरेंद्र पाटोळे, संगणक विद्याशाखा संचालक माधव पळशीकर, मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. सज्जन थूल, आरोग्य विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. रश्मी रानडे उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले, की जगभरात कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. त्याचबरोबर जगात डाटा, पाणी व खाणकाम यांना महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे यातील कौशल्यप्राप्त व्यक्तींना व्यवसाय व रोजगाराच्या अधिक संधी आहेत.

जग बदलत असताना आपल्या राष्ट्राच्या विकासात योगदान देण्यासाठी कौशल्य प्राप्त मनुष्यबळ निर्माण करणे व पुढील पिढीसाठी नैसर्गिक संसाधन कायम ठेवणे हे अशा सामंजस्य कराराचे उद्दिष्ट असल्याचे कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी सांगितले.

अशोका बिल्डकॉनचे संचालक अशोक कटारिया याप्रसंगी बोलताना म्हणाले, की या करारामुळे मुक्त विद्यापीठाचे छत्र प्राप्त होऊन संबंधित शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांचे प्रमाणीकरण होणार आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी प्राप्त होणार असून, भविष्यात या शिक्षण–प्रशिक्षणाचे अधिक केंद्र उघडून कराराचेही विस्तारीकरण करण्यात येईल.

एमजीईएसपीएलचे कार्यकारी संचालक नितीन अहिरे म्हणाले, की जगभरात यंत्रसामग्रीचा इंधन, दुरुस्ती खर्च कमी कसा करता येईल व कार्यक्षमता कशी वाढविता येईल, यावर संशोधन करून त्यावर मोठ्या प्रमाणात खर्चदेखील केला जातो; मात्र या यंत्रसामग्रीसंबंधी काम करणारे मनुष्यबळ यांच्या शिक्षण–प्रशिक्षणाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही.

या कराराद्वारे देश विदेशातील बांधकाम, खाणकाम व संबंधित यंत्र व इतर सामग्री व्यवस्थापनासंबंधी उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ पुरविले जाईल, असा विश्वास अहिरे यांनी व्यक्त केला. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले. डॉ. माधुरी खर्जुल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# भाजपाच्या संघटनात्मक निवडणुका

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या असून, आधी वॉर्डप्रमुख, नंतर मंडल प्रमुख आणि त्यानंतर शहराध्यक्षांच्या निवडणूक होणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर भाजपाचे प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी संघटन पर्वाची घोषणा करणार आहेत. यापूर्वी संघटनात्मक निवडणुका झाल्यानंतर अनुक्रमे लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. आगामी महापालिका, जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असून, त्या पार्श्वभूमीवर शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षपदासाठी स्पर्धा वाढली आहे. माजी नगरसेवक हिमगौरी आडके, उत्तम उगले, काशीनाथ शिलेदार, सुनील केदार यांची नावे देखील चर्चेत आहेत.

वरिष्ठ पातळीवरील आणि सध्या महत्त्वाचे पद नसलेल्या नेत्यांचा विचार करता माजी आमदार बाळासाहेब सानप, लक्ष्मण सावजी, विजय साने यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. चुरस किती वाढते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# सुकाकाथ मसाला

## घराबाहेर

चिंतोपंत बायकोला कुठं म्हणजे कुठ्ठं घेऊन जायचे नाहीत. घर एक्के घर, घर दुणे घर! घराबाहेर पडायचं म्हणजे रेल्वे–बसचं भाडं आलं, हॉटेलमध्ये राहण्याचा–जेवण्याचा खर्च आला. खर्चच खर्च. कोण हा खर्च करेल? त्यापेक्षा पोस्टाचं बचतपत्र घ्यावं. पैशापरी पैसा वाचतो, प्रवासाचा त्रास वाचतो, वर व्याज मिळतं.

वसुधाबाईंना सारखं घर, घर आणि घरघर नको झाली होती. उघड्यावर हिंडावं, डोंगर पाहावा, दरीत डोकवावं, सूर्य पाहावा, चंद्र पाहावा असं त्यांना वाटायचं.

एके रात्री चक्रीवादळ आलं. घराच्या छपराचे पत्रे उडाले, भिंती पडल्या. चिंतोपंत–वसुधाबाई रडायला लागल्या. चिंतोपंत म्हणजेच चिकटोपंत समजावणीच्या सुरात म्हणाले, ‘‘वसुधाबाई, रडू नका. आपण वाचलो हे काय कमी आहे?’’

# खाण्यासाठी चेंज हवा?

## मिसळीची भाकरी

**साहित्य :–** प्रत्येकी दोन वाट्या काळे उडीद, चणा, डाळ, चार वाट्या बाजरी, दोन वाट्या ज्वारी, एक वाटी मक्याचे दाणे.

**कृती :–** उडीद व चण्याची डाळ चांगली भाजून घ्यावी. बाजरी, ज्वारी व मक्याचे दाणे यात ही भाजलेली दाळ एकत्र करून दळून आणावी. नेहमीप्रमाणे भाकरी कराव्यात. लसणाच्या चटणीबरोबर

# आरोग्य विद्यापीठाचे विविध संस्थांसमवेत सामंजस्य करार





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने फार्मास्युटिकल मेडिसिन क्षेत्रात विविध संशोधन व कौशल्य विकास उपक्रमांकरिता विविध संस्थांसमवेत नुकतेच सामंजस्य करार केले आहेत.

या सामंजस्य करार आदान–प्रदान समारंभास विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त), प्रति–कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील व प्रभारी अधिष्ठाता डॉ. स्वाती जाधव उपस्थित होते.

यावेळी आय. सी. एम. आर. च्या संचालिका डॉ. गीतांजली सचदेव, संशोधक डॉ. राहुल गजभिये, एम.आय.टी. ऑफ बायोइंजिनिअरिंगचे प्रा. विनायक घैसास, अधिष्ठाता डॉ. रेणू व्यास, टॉक्सइंडियाचे संचालक डॉ. वसंत नरके, सी. ई. ओ. देवेन नरके, रॅप ॲनालिटल रिसर्च प्रा. लि. च्या संचालिका हर्षदा पवार व लर्नकोचच्या संचालिका दीपाली तिवारी उपस्थित होत्या.

यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) माधुरी कानिटकर यांनी सांगितले, की भविष्यात या क्षेत्रात मोठा वाव आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व कौशल्य आदी उपक्रमांना अधिक चालना मिळविण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या सामंजस्य करारांच्या माध्यमामार्फत सिकलसेल, कुष्ठरोग व सर्पदंश यांसारख्या संशोधनांवर काम करणे शक्य होणार आहे. ॲनिमल हाऊस, प्री क्लिनिकल सुविधा व प्रगत उपकरणे यांचा समावेश आहे. नवीन फार्माकॉलॉजिकल तपासण्यांसाठी प्राण्यांचे मॉडेल, प्राण्यांचा ट्रान्सजेनिक वापर करून अधिक सुरक्षित औषधशास्त्र विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे प्रति–कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ यांनी सांगितले, की या सामंजस्य करारांतर्गत विद्यापीठ व करार झालेल्या संस्थांमार्फत विविध शैक्षणिक, प्रशिक्षण, अभ्यास दौरे, समर इंटर्नशिप कार्यक्रम यासारखे उपक्रम सर्वच संस्थांमार्फत राबविले जाणार आहे. आय. सी. एम. आर. च्या समवेत झालेल्या करारांतर्गत आयसीएमआरच्या वणी येथील केंद्रामार्फत सिकलसेल ॲनिमिया, कुष्ठरोग, सर्पदंश, तसेच मुंबई येथील एनआयआरआरसीएच केंद्रामार्फत ॲनिमल हाऊस फॅसिलिटी, प्री क्लिनिकल स्टडीज, ॲडव्हान्स ॲनेलिटीकल इन्स्ट्रूमेंटेशन या विषयांवर संशोधन आणि कौशल्य उपक्रम राबविण्यात येणार आहे. एम. आय. टी. स्कूल ऑफ बायोइंजिनिअरिंगकडून सेल कल्चर, फ्लो सायटोमेट्री, बायोइन्फॉरमॅटिक्स आणि ॲनालिटिकल सुविधा, कौशल्यवाढीसाठी विद्यार्थ्यांची देवाणघेवाण आदी उपक्रम राबविले जाणार आहेत. टॉक्स इंडियाकडून प्री क्लिनिकल फार्माकोलॉजी अभ्यास, ट्रान्सजेनिक प्राणी अभ्यास, नॉक–आऊट माईस, ट्रान्सजेनिक स्टडीज् व इम्युनोडेफिशिएंट आदी विषयावर उपक्रम राबविण्यात येणार आहे., रॅप ॲनालिटल रिसर्च प्रा. लि. कडून संशोधन क्षेत्र, प्रगत विश्लेषणात्मक उपकरणे आदी उपक्रम राबविले जाणार आहेत.

याप्रसंगी प्रा. स्वाती जाधव यांनी या करारांबाबतची माहिती व त्याद्वारे होणारे विविध उपक्रम यांची माहिती दिली. याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत शिवगुंडे यांनी केले, तसेच आभारप्रदर्शन डॉ. महेंद्र पटाईत यांनी केले. याप्रसंगी उपकुलसचिव एन. व्ही. कळसकर, ब्रिगेडियर सुबोध मुंळगुंद, डॉ. भारती डॉ. प्रदीप आवळे, डॉ. गीतांजली कार्ले, डॉ. स्वप्नील तोरणे, डॉ. अनुश्री नेटके, राजेंद्र शहाणे, संदीप राठोड, डॉ. श्वेता तेलंग, डॉ. सानिया भालेराव, डॉ. वैभव आहेर आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# कठीण मेहनतीने ध्येय साध्य होते : गुलाबराव सोनवणे



**येवला (भ्रमर वार्ताहर) :–** आईवडील हे आपले पहिले गुरू असतात, तर शिक्षक हे दुसरे गुरू असतात. त्यामुळे आईवडिलांचा व गुरुजनांचा आदर करणे हे सर्वांचेच कर्तव्य आहे. लहानपणापासूनच ध्येय निश्चिती आणि कठोर मेहनत केली, तर आपली ध्येय सहज गाठता येते व यश मिळतेच, असे प्रतिपादन राज्याच्या जलसंपदा विभागाचे माजी कार्यकारी अभियंता व विद्यालयाचे माजी विद्यार्थी गुलाबराव सोनवणे यांनी केले.

प्रमुख अतिथींचा परिचय संस्थेचे प्रशासकीय अधिकारी दत्ता महाले यांनी करून दिला. संस्थेचे सरचिटणीस सुशील गुजराथी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांसाठी गुजराथी यांनी २१ हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

विद्यालयाचे गुणवंत शिक्षक सतीश विसपुते, प्रा. कैलास पाटील, नीलेश निकम, डॉ. सुहासिनी शिंदे, विजय क्षीरसागर, विजय पैठणे, तसेच आदर्श ग्रामविकास अधिकारी कविता कळमकर यांचा गुणगौरव याप्रसंगी करण्यात आला. एस. एस. सी. परीक्षा २०२४ मध्ये विद्यालयात सेमी इंग्लिश माध्यम प्रथम व द्वितीय आलेले अनुक्रमे मृणाल साबळे, आयुष पहिलवान व मराठी माध्यमातून प्रथम आलेले शंतनू कदम व निशा आरणे, तसेच एच. एस. सी. परीक्षा २०२४ मध्ये वाणिज्य शाखेतून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अनुराधा भागवत, रोहिणी गाढे, विज्ञान शाखेतून अनुक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या स्नेहल जानराव, कौमुदी गिते, कला शाखेतून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अक्षया सोनवणे, दिव्या लकारे तसेच क्रीडा स्पर्धेतील गुणवंत खेळाडू विश्वजित लोणारी, ओम् शेळके, भाग्यश्री पवार, साक्षी देशमुख, तसेच वक्तृत्व स्पर्धेतील गुणवंत वैष्णवी फुलारे, एन. एम. एम. एस. परीक्षेतील गुणवंत समृद्धी भागवत, सिद्धांत कांबळे, रिया औटी, यशश्री लांडगे, मुंबई पोलीस दलात भरती झालेली गायत्री पाबळे व प्रत्येक इयत्ता तुकडीतील प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुशील गुजराथी यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यालयात शिक्षण घेऊन उच्च पदावर गेलेले विद्यार्थी विद्यालयाप्रति ऋण व्यक्त करताना ते सढळ हस्ते मदत करतात, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे संचालक पुरुषोत्तम वर्मा, अल्केश कासलीवाल, मालेगाव मनपाचे माजी सहआयुक्त राजेंद्र धसे, विद्यालयाचे माजी प्राचार्य भगीरथ गायकवाड, माजी उपप्राचार्य सुरेश जोरी, माजी पर्यवेक्षक शांताराम गायकवाड, माधवराव गायकवाड, चंपा रणदिवे व बहुसंख्य पालक उपस्थित होते.

पारितोषिक वितरण समारंभाचे नियोजन प्राचार्य दत्तकुमार उटवाळे, उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार व उच्च माध्यमिक विभागप्रमुख कैलास पाटील यांनी केले. पारितोषिक विजेत्यांच्या यादीचे वाटप वाचन रामेश्वरी शिंदे, विजय साळुंके, आसावरी जोशी, योगीता विसपुते, सुरेखा गिरासे, प्रेरणा जोशी, शीतल शिंदे, स्वाती सानप, वीणा पराते यांनी केले. गौरवपत्राचे वाचन व कार्यक्रमाचे सूत्रसंचलन उत्सवप्रमुख डॉ. सुहासिनी शिंदे यांनी केले, तर आभार पुष्पा कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राम पटेल, विजय पैठणे, कलाशिक्षक प्रकाश सोनवणे, रमेश माळी, सतीश विसपुते, सरस्वती नागपुरे, शीतल शिंदे, नीलेश निकम, सारिका चौधरी, रीना पाबळे, गीताश्री शिंदे, अंकुश ललवाणी, वीणा पराते, अंकुश गाडेकर, वैशाली पाटणकर, अरविंद जोरी, संदीप खोजे, अनिल पगारे, विजय मोकळ, मारुती माळी व पूनम शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# उद्धव ठाकरे यांचा दौरा यशस्वितेसाठी बैठका सुरू

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे येत्या दि.१६ रोजी नाशिक दौऱ्यावर येत असून, या दौऱ्यात ते शिवसैनिकांशी संवाद साधणार असल्याने शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्याच्या नियोजनाच्या दृष्टीने विभागवार बैठकांना प्रारंभ झाला आहे.

त्याचाच एक भाग म्हणून पंचवटी आणि नाशिकरोड येथे झालेल्या बैठकीत उद्धव ठाकरेंचा हा दौरा यशस्वी करण्याचे आवाहन मान्यवर पदाधिकाऱ्यांनी केले. आगामी महानगरपालिका तसेच जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका, राज्यात आणि विशेषतः नाशिकमध्ये निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती, राज्यातील सध्या राजकीय स्थिती, विधानसभा निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्यास सरकारला आलेले अपयश या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या या दौऱ्याला विशेष महत्त्व असून, ते शिवसैनिकांना काय मार्गदर्शन करतात, याचीच उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे.

पंचवटी विभागाची बैठक रामकुंड परिसरातील लेवा पाटील समाज सेवा कार्यालय येथे तर नाशिकरोड विभागाची बैठक सदगृह मंगल कार्यालय येथे झाली. यावेळी उपनेते सुनील बागूल, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, शिवसेना जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, माजी आमदार वसंत गिते, केशव पोरजे, महेश बडवे, सचिन मराठे, गुलाब भोये, मामा राजवाडे, दिलीप मोरे, युवा सेना जिल्हाधिकारी राहुल ताजनपुरे, भाविसेचे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, उपमहानगरप्रमुख सुनील जाधव, सुनील निरगुडे, विधानसभाप्रमुख राहुल दराडे, समन्वयक शैलेश सूर्यवंशी, युवासेना मतदार यादीप्रमुख मसूद जिलानी, महिला आघाडीच्या स्वाती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# ओवी गोसावी हिचे यश

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालय, मखमलाबाद येथील सीपीएस ऑलिम्पियाड फाऊंडेशन माध्यमातून गणित या विषयाच्या परिक्षेत ओवी भगवान गोसावी (इयत्ता ६ वी) हिने प्रथम प्रावीण्य मिळविले.

ओवी हिने १००पैकी ६२.५० गुण प्राप्त केले आहेत व ५५२२ ऑलिम्पियाड रॅंक प्राप्त केले आहेत. महाराष्ट्रामध्ये १५१३ रॅंक मिळाली आहे आणि अंतरराष्ट्रीय गणित बिझार्ड ऑलिपीयाड सन – २०२४ पहिल्या स्तरावर रॅंक वर्ग एक मिळाला आहे.

या यशाबद्दल ओवीचे शाळेचे प्राचार्य संजय डेर्ले, उपमुख्याध्यापिका रायते पर्यवेक्षक पाटील, शिक्षक शिक्षकेतरांनी अभिनंदन केले.

# अभिनेते सागर कारंडे यांनी मिमिक्रीतून प्रेक्षकांची मने जिंकली



**पिंपळगाव बसवंत (भ्रमर वार्ताहर) :–** कला हा जीवनाचा भाग आहे. प्रत्येकात कला असते फक्त त्याला योग्य दिशा वा व्यासपीठ मिळाले, तर आपण आपले व्यक्तिमत्त्व फुलवू शकतो, असे सांगून सुप्रसिद्ध मराठी विनोदी अभिनेते सागर कारंडे यांनी जीवनातील प्रसंगांचे वर्णन आपल्या नाट्य अभिनयातून सादर केली. निळू फुले, मकरंद अनासपुरे, नाना पाटेकर यांच्या आवाजाची प्रत्यक्ष मिमिक्री करून प्रेक्षकांची मने जिंकली.

मविप्र संचलित येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयात वार्षिक गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, श्रीमती शोभाताई बोरस्ते, भागवतबाबा बोरस्ते, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र मोरे, सुनील पाटील, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, चेतन मोरे, अरुण मोरे, शामराव मोरे, राजेंद्र निरगुडे, विकास बनकर, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, स्नेहसंमेलनप्रमुख प्रा. नामदेव गावित आदी मान्यवर उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर म्हणाले, की पिंपळगाव महाविद्यालय हेदेखील ग्रामीण भागातील उच्च शिक्षणासाठी गणले जाणारे महाविद्यालय आहे येथील विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांत आपला नावलौकिक मिळवीत आहेत. आज विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपली ध्येय निश्चित करता येऊ शकते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, असे विचार मांडले.

अध्यक्षीय मनोगतात मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे म्हणाले, की मविप्र संस्थेच्या उभारणीमध्ये कर्मवीरांचे योगदान हे वाखाणण्याजोगे आहे. विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात सद्गुण, परिश्रम आणि नैतिकतेला महत्त्व द्यावे. केवळ शैक्षणिक गुणवत्ता ही महत्त्वाची नाही, तर सामाजिक दायित्व, सहकार्य, आणि आत्मविकास हेदेखील महत्त्वाचे आहेत. जीवनात यश मिळविण्यासाठी प्रेरणा, प्रयत्न आणि संयम आवश्यक आहे, आणि प्रत्येकाने आपल्या क्षमतेचा सर्वोत्तम उपयोग करावा.

यावेळी भारतीय सेनादलात व पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर महाविद्यालयात वर्षभरात क्रीडा, तसेच विविध स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश मिळविलेले विद्यार्थी, तसेच वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. तसेच वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांना सर्वोत्कृष्ट सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीपूजन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तसेच कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांची जयंती निमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवालवाचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय स्नेहसंमेलनप्रमुख प्रा. नामदेव गावित यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र खांडगे व प्रा. धनंजय देशमुख यांनी केले, आभार प्रा. हेमंत पाटील यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकाचे आज प्रकाशन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक लोकल प्रकाशन संस्थेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकाचे प्रकाशन आज (दि. ७) रोजी सायंकाळी ५ वाजता लायन्स क्लब हॉल, जुनी पंडित कॉलनी, येथे होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अनिल वैद्य, तसेच प्रमुख पाहुणे पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, किरणकुमार चव्हाण उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विशेष अंकाचे संपादक सतीश रूपवते व कार्यकारी संपादक अविनाश आहेर यांनी केले आहे. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कारार्थी माजी उपमहापौर गुलाम शेख, डॉ. बच्छाव, विजय देवरे, कैलास गोसावी, पत्रकार नरेंद्र आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सतीश रूपवते, अविनाश आहेर, भरत गोसावी, नितीन सातपुते, संजय तांबे, राहुल चौघुले, सुरेश पवार आदी प्रयत्नशील आहेत.



# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मनसेचे आंदोलन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** राज्यातील शेतकरी बांधवांसाठी एक रुपयांत प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू करावी, सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करत सात–बारा कोरा करावा व मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी मनसेच्या वतीने नुकतेच लाक्षणिक आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, जिल्हाध्यक्ष रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे यांच्या उपस्थितीत प्रत्येक तालुक्यातील तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालय तसेच नाशिक शहरात जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले.

शासनाने २० मार्च २०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शेतकऱ्यांचा एक रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला. त्याच प्रकारे ऐनवेळी शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यास नकार दिला. यामुळे शेतकऱ्यांवर मोठा अन्याय झाल्याने या गोष्टीवर शासनाने प्रामुख्याने लक्ष केंद्रित करून एक रुपया प्रधानमंत्री पीक विमा योजना त्वरित चालू करावी. राज्यातील सुरक्षा सुव्यवस्था याबाबत जनसामान्यांमध्ये आता प्रश्न उभे राहू लागलेले आहेत. दररोज मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढत आहे. निष्पाप कार्यकर्त्यांचा जनसामान्यांचा बळी जात आहे. राज्य सरकार झोपले आहे की काय, असा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आले.

यावेळी महिला सेना प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, मनोज घोडके, खंडेराव मेढे, नितीन काळे, सचिन सिन्हा, सत्यम खंडाळे, नितीन माळी, धीरज भोसले, योगेश दाभाडे, बंटी कोरडे, ज्ञानेश्वर बगाडे, विजय अहिरे, विशाल भावले, मिलिंद कांबळे, अर्जुन वेताळ, गोकुळ नागरे, विद्यार्थी सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, संदीप दोंदे, अतुल पाटील, विश्वास तांबे, किरण क्षीरसागर, राकेश परदेशी, नितीन धानापुणे, महिला सेनेच्या शहराध्यक्ष आरती खिराडकर, अक्षरा घोडके, अरुणा पाटील, शैला शिरसाट, अश्विनी बैरागी, एकता सोनार, राजू परदेशी, नितीन अहिरराव, विश्वास रूपवते, अविनाश अंबापुरे, नवनाथ जाधव, रोहित उगावकर, बबलू ठाकूर, अमोल गोजरे व राहुल पाटील उपस्थित होते.

# नाशिकचा डीव्हीसीए विरुद्ध थरारक विजय



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** येथे होत असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या, राज्यस्तरीय १९ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेच्या (एम. सी. ए. इन्व्हिटेशन लीग), दोनदिवसीय कसोटीत हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लबवर झालेल्या सामन्यात नाशिक संघाने डी. व्ही. सी. ए. क्लब, पुणे या बलाढ्य संघाविरुद्ध सामन्याच्या चौथ्या डावात विजयासाठी २४८ धावांचा यशस्वी पाठलाग करून सामन्यातील शेवटच्या षटकात चार चेंडू बाकी असताना थरारक विजयाची नोंद केली.

नाशिकच्या फलंदाजांनी विशेषतः दुसऱ्या डावात, उत्तम सांघिक कामगिरी केली. त्यातही कर्णधार समकित सुराणाने दोन्ही डावात अर्धशतके व सामन्यात पाच बळी अशी पुन्हा एकदा जोरदार अष्टपैलू कामगिरी केली, त्यास मुख्यतः वेद सोनवणे व हुजैफ शेख यांची उत्तम साथ मिळाली.

प्रथम फलंदाजी मिळालेल्या डी. व्ही. सी. ए. ने सर्वबाद २१५ धावा केल्या. नाशिकच्या कर्णधार समकीत सुराणाने तीन, तर कृष्णा केदार, व्यंकटेश बेहरे व नील चंद्रात्रेने प्रत्येकी दोन व अथर्व सूर्यवंशीने एक बळी घेतला. उत्तरादाखल नाशिकच्या पहिल्या डावात सर्व बाद १३० च धावा झाल्या. वरद छट्टरने चार बळी घेतले. समकित सुराणाने ५३ व वेद सोनवणेने ३२ धावा केल्या. दुसऱ्या डावात डी. व्ही. सी. ए. ने ४ बाद १६२ धावांवर डाव घोषित करून चौथ्या डावात विजयासाठी नाशिकला २४८ धावांचे आव्हान दिले. डी. व्ही. सी. ए. च्या अथर्वने नाबाद ७७ धावा केल्या. समकित सुराणा व हुजैफ शेखने प्रत्येकी २ बळी घेतले. नाशिकच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात २४८ धावांचे आव्हान स्वीकारत आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर सोहम् तमखाने ३१ चेंडूत ४३ धावांत ५ चौकार व २ षटकार व कृष्णा केदारने १७ चेंडूत २९ धावा, २ चौकार व २ षटकार फटकावत केवळ ६ षटकांत बिनबाद ५७ व ११ व्या षटकात २ बाद ८४ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावरील वेद सोनवणेने ६८ चेंडूत ६० धावांत ६ चौकार व १ षटकार ठोकला; पण त्यानंतर ठराविक अंतराने फलंदाज बाद होत गेल्याने, व्यंकटेश बेहरे १५ धावा फटकावून, धावबाद झाल्यावर नाशिकची अवस्था ३६.१ षटकांत ७ बाद १८९ अशी झाली; पण त्यानंतर पाचव्या क्रमांकावरील कर्णधार समकित सुराणाला नवव्या क्रमांकावरील हुजैफ शेख याची उत्तम साथ मिळाली. या दोघांनी विजयासाठीच्या आवश्यक ५९ धावा केवळ ४३ चेंडूंमध्ये फटकावत पहिल्या डावात ७५ धावांनी पिछाडीवर पडलेल्या नाशिक संघाला, बाजी पलटवत तीन गडी राखून सामन्यातील अखेरचे केवळ ४ चेंडूच बाकी असताना विजय मिळवून दिला. कर्णधार समकित सुराणाने ७२ चेंडूत ११ चौकारांसह नाबाद ५३, हुजैफ शेखने २० चेंडूंत २ चौकारांसह नाबाद २३ अशी विजयी कामगिरी करीत थरारक विजयाची नोंद केली. या १९ वर्षांखालील नाशिक जिल्हा संघाचे प्रशिक्षक सुनील पटेल आहेत.

## तरुणावर कोयत्याने वार

**इंदिरानगर (भ्रमर प्रतिनिधी) :–** पाथर्डी फाटा येथील सवराजनगर परिसरात तुझ्या बहिणीने माझ्याविरोधात तक्रार का केली, अशी विचार करीत आदित्य मगर याच्यावर संशयित तुषार घारे याने कोयत्याने वार करून जखमी केले. याबाबत पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# वृक्षतोड, छाटणी परवानगीसाठी आता ऑनलाईन सेवा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे आता धोकादायक वृक्षतोड व छाटणीकरिता ऑनलाईन सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. मनपा प्रशासनाने उद्यान विभागासाठी स्वतंत्र पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलचे अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांच्या उपस्थितीत सादरीकरण करण्यात आले.

या पोर्टलमधील तांत्रिक अडचणी दूर करून पुढील आठवड्यात नागरिकांना त्याचा वापर करता येणार आहे, अशी माहिती उद्यान अधीक्षक विवेक भदाणे यांनी दिली. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी आयुक्तपदाचा कारभार हाती घेतल्यापासून सर्वाधिक तक्रारी या उद्यान विभाग, नगररचना, तसेच उद्यान विभागाविषयीच असल्याचे समोर आले होते. त्यानुसार त्यांनी विभागांमधील कामकामाजात बदल करण्यासाठी उद्यान विभागातील कामकाज ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला.

उद्यान विभागाकडे वृक्षतोड आणि वृक्ष छाटणीसाठी नागरिकांकडून अर्ज केले जातात; मात्र मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे या अर्जांचा वेळेवर निपटारा उद्यान विभागाकडून होत नसल्याने, तसेच नागरिकांची पिळवणूकदेखील उद्यान विभागाकडून होत असल्याच्या तक्रारी आयुक्तांना प्राप्त झाल्या होत्या. त्यावर आयुक्त खत्री यांनी उद्यान विभागाच्या परवानग्यांसाठी स्वतंत्र पोर्टल विकसित करण्याचे निर्देश उद्यान विभागाला दिले. त्यानुसार अधीक्षक विवेक भदाणे यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून ऑनलाईन पोर्टल तयार केले असून, त्याचे सादरीकरण अतिरिक्त आयुक्त नायर यांच्यासमोर झाले.

# सिडको कार्यालयावर भाजपाचा हंडा मोर्चा



**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** इंदिरानगर प्रभाग क्रमांक ३१ मध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिक विविध समस्यांनी त्रस्त आहेत. भीषण पाणीटंचाई, खराब रस्ते, अपूर्ण लाईट व्यवस्था आणि डिव्हायडरची कमतरता यामुळे नागरिकांचा संताप वाढत चालला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने बाळकृष्ण शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली सिडको विभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात महिलांचा विशेष सहभाग होता. डोक्यावर पाण्याचे हंडे घेऊन आणि हातात भाजपचे झेंडे घेऊन महिलांनी घोषणाबाजी केली. या मोर्चात पाथर्डी फाटा, सराफनगर, जायभावेनगर, ज्ञानेश्वरनगर, मुरलीधरनगर आणि वासननगर परिसरातील नागरिक सहभागी झाले होते.

या आंदोलनात बाळकृष्ण शिरसाठ यांच्यासह भाजयुमोचे शहर उपाध्यक्ष प्रशांत बडगुजर, माजी नगरसेविका पुष्पा आव्हाड, भाजपचे भगवान दोंदे, ॲड. श्याम बडोदे, साहेबराव आव्हाड आदींसह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले आणि समस्यांवर त्वरित तोडगा काढण्याची मागणी केली. महिलांनीही आपली व्यथा मांडताना प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. रोजची पाणीटंचाई, त्यामुळे पाणी मिळविण्यासाठी हेलपाटे, त्यामुळे लहान मुले, आजारी व्यक्ती व वृद्ध यांना यामुळे खूप त्रास होतो. रस्ते खराब आहेत, रात्री पथदीप बंद असल्यामुळे महिलांना सुरक्षित वाटत नाही आदी तक्रार केल्या. या समस्या लवकरच सुटतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ईश्वरी मोरे, प्रांजल शिंदे यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) व छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत नाशिक जिल्हा विधायक कार्य समिती सटाणा संचलित, खर्डे येथील इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कु. ईश्वरी रामदास मोरे हिने शिष्यवृत्तीत व कु. प्रांजल माणिक शिंदे हिने सारथी परीक्षेत यश मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजय पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मधुकर देवरे, शालेय समितीचे राहुल देवरे, पालक संघाचे उपाध्यक्ष शशिकांत ठाकरे, प्राचार्य संजय आहेर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# चितेगाव फाटा येथे दत्तमंदिराचे भूमिपूजन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** चितेगाव फाटा येथील श्री दत्त मंदिर गोसेवा संस्थानच्या वतीने साकारण्यात येणाऱ्या भव्य श्री दत्त मंदिराचा भूमिपूजन सोहळा संस्थापक अध्यक्ष ज्योतिष विद्यावाचस्पती पुरुषोत्तम जोशी महाराज, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच झाला.

या प्रसंगी ब्रह्मलीन श्री श्री १०८ गुरुदेव पीर महंत योगी श्री गुरू बद्रीनाथजी महाराज, पुण्याचे महंत योगी समशेरनाथजी , नाशिकच्या कैलास मठाचे आचार्य महामंडलेश्वर स्वामी संविदानंद सरस्वतीजी महाराज पीर महंत लकीनाथजी महाराज (पंजाब) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे महंत आचार्य डॉ. अनिकेत शास्त्री महाराज (अखिल भारतीय संत समितीचे महाराष्ट्र प्रदेश प्रमुख), वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी (अध्यक्ष महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान नाशिक), खा. राजाभाऊ वाजे, आमदार दिलीप बनकर, अनिल कदम, योगेश घोलप, व्यापारी बँकेचे चेअरमन दत्ताजी गायकवाड, माजी नगरसेवक उद्धव निमसे, पुरोहित संघाचे अध्यक्ष मनोज खेडलेकर, अतुल धोंगडे, निशांत अवसकर, समाधान थोरात आदी उपस्थित होते. यावेळी संयोजकांच्या वतीन संत–महंतांचा व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी समस्त श्री दत्तभक्त मंडळाचे शेखर जेठे, आदित्य राजपूत, प्रवीण हिंगमिरे, संतोष प्रभाणे, रामदास जाधव, राजेश हिंगमिरे, मुकुंद जाधव, धनंजय सोनवणे, सोमनाथ भडांगे, अमोल धोंगडे, शिवा धोंगडे, अक्षय आहेर, स्वप्नील आहेर, महेंद्र पवार, संदीप महाले, संदीप दिडे, दशरथ दिंडे, अनिल रणाळकर, सिद्धार्थ नाठे, प्रतीक काळे, मिलिंद गंभीर, बंडू जाधव, रुही कांकरिया, दीपक पाटील, वैभव थोरात, राजेंद्र गुळवे, कैलास टर्ले, नितीन पेखळे, तसेच गावकरी उपस्थित होते.

# स्त्रीरोगतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. नेहा लाड



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ संघटना अर्थात एनओजीएसच्या नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी डॉ. वासंती (नेहा) लाड यांची निवड झाली आहे. तर सचिवपदी गौरी पिंप्राळेकर व नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा प्रसिद्ध बालशल्यचिकित्सक व महाराष्ट्र कोविड टास्क फ़ोर्स चे चेअरमन डॉ. संजय ओक आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भारती ढोरे–पाटील आदींच्या उपस्थितीत नुकताच झाला. नूतन कार्यकारिणी – डॉ. गौरी पिंप्राळेकर, डॉ. मनीषा जगताप (प्रेसिडेंट इलेक्ट), डॉ. व्ही. बी. शेख (खजिनदार), डॉ. अभिजित पाटील (उपाध्यक्ष), डॉ. आनंद तांबट (उपाध्यक्ष), डॉ. वर्षा लहाडे, डॉ. कविता गाडेकर (क्लिनिकल सेक्रेटरी), डॉ. श्रद्धा सबनीस (जॉईंट सेक्रेटरी), डॉ. चंदन गुप्ता (सहखजिनदार), डॉ. क्षमा अघोर (जॉईंट क्लिनिकल सेक्रेटरी), कार्यकारिणी सदस्या डॉ. प्रेरणा शिंदे, डॉ. नितीन पाटील, डॉ. चेतना दहिवेलकर, डॉ. दिनेश बागूल, डॉ. प्रमोद ताजणे व डॉ. चारुमती पेखळे यांचा समावेश आहे.


# जाहीर नोटीस

तमाम नागरिकांस या नोटीसने कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री सो. महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील १०० दिवस कृती आराखड्यातील सप्तसूत्री कार्यक्रम नियोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत इंदिरानगर पोलीस स्टेशन कडील बेवारस मुद्देमाल निर्गती करण्याचे अनुषंगाने आढावा घेतला असता निकाली गुन्ह्यातील २१ व बेवारस स्थितीत मिळून आलेल्या ०८ मोटार सायकल मालकांना समजपत्र पाठवून देखील अद्यापपावेतो मालकी हक्काबाबत कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. तरी या नोटिसीद्वारे संबंधित मालकांना त्यांचे मालकीची वाहने ७ दिवसांचे आत (दिनांक १२/०४/२०२५ पावेतो) मालकी हक्काबाबतचे कागदपत्र घेऊन इंदिरानगर पोलीस ठाणेत हजर राहून सदरची वाहने घेऊन जावी याबाबत इंदिरानगर पोलीस निरीक्षक यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे. सदर वाहनांचे मालक यांनी वेळेत कार्यवाही न केल्यास सदरच्या वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येणार असून नमूद कालावधीनंतर कोणतेही अर्ज/तक्रार यांची दखल घेण्यात येणार नाही.

ठिकाण – नाशिक तर्फे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती तृप्ती सोनवणे, इंदिरानगर पो. स्टे., नाशिक शहर

| अ. नं | गु. र. नं. व कलम | वाहनाचा रजि. नंबर व प्रकार | मो. सा. चेसीस नंबर | मो. सा. इंजिन नंबर |
|---|---|---|---|---|
| १ | १५९/१० कलम ३७९ | हिरो होंडा कंपनीची सीबीझेड | 02G46000740 | 01E41M93102 |
| २ | १०/२०११ भादंविक ३७९ | KA-01-EA-5669 बजाज कंपनीची डिस्कव्हर काळ्या रंगाची | DSVBMJ31718 | DSGBMJ73858 |
| ३ | १०/२०११ भादंविक ३७९ | हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | 05D16F12847 | 05D15E12858 |
| ४ | १९३/२०११ कलम ३९४, ३४ | हिरो कंपनीची CD-100 | ----- | A10E009235 |
| ५ | ६००१/२०१२ मुं. प्रो. ॲ. ६५ (ख) | MH-19-D-0161 स्कूटर सिल्व्हर रंगाची | ----- | ----- |
| ६ | १११/१२ कलम ३७९ | बजाज कंपनीची पल्सर सिल्व्हर रंगाची | DHVBKA08552 | DAGBKA80504 |
| ७ | ५३/२०१४ कलम ३५३, ३४, २७९ | बजाज कंपनीची डिस्कव्हर लाल रंगाची | BZ9DWB13842 | TAZWD854045 |
| ८ | ५९/२०१४ कलम ३२५, ३२६, ३२३, ५०४, ३४ | हिरो कंपनीची पॅशन लाल रंगाची | U1M21C07877 | 01M21M19371 |
| ९ | १७५/२०१४ कलम ३७९, २०१ | DN-09-E-4431 होंडा कंपनीची सिडी डिलक्स | 07E23F46695 | 07E22E58139 |
| १० | २००/२०१४ कलम ३७९ | हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | MBLHA10EE9HC26912 | HA10EA9HB83345 |
| ११ | २००/२०१४ कलम ३७९ | हिरो कंपनीची सिडी डॉन | 03G27F27538 | 03G27E24992 |
| १२ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-03-BL-4299 होंडा कंपनीची ट्वीस्टर | ME4JC476JB7007721 | JC7E2048887 |
| १३ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-41-R-5197 हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | MBLHA10ACA9100181 | HA10EHA9J02350 |
| १४ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-16-AS-3095 हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | MBLHA10EYB9E05896 | HA10EFB9F14063 |
| १५ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-14-BL-2830 हिरो कंपनीची ॲक्टीवा ग्रे रंगाची | ME4JF083C88255964 | JF08E5287963 |
| १६ | १६८/२०१५ भादंविक ३७९ | बजाज कंपनीची पल्सर काळ्या रंगाची | MD2DHDZZNCK83140 | DHGBNK21072 |
| १७ | १६८/२०१५ भादंविक ३७९ | हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | MBLHA10EYHC72334 | HA10EFC10919 |
| १८ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-15-DP-3429 हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | MBLHA10AMCHF72490 | HAHDEJHF86621 |
| १९ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | 09C19C04747 | ----- |
| २० | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | बजाज कंपनीची कावासाकी | DDFBXC80070 | DDMLBKC40858 |
| २१ | १६८/२०१५ भादंविक, ३७९ | MH-15-CF-0813 हिरो कंपनीची पॅशन लाल रंगाची | MBLHA10EL8GE68532 | HA10EB8GE72893 |

**बेवारस वाहनांची यादी खालील प्रमाणे**

| अ. नं. | वाहनांचा रजिस्ट्रेशन क्रमांक | वाहनांचा प्रकार | चेसी क्रमांक | इंजिन नंबर |
|---|---|---|---|---|
| 1 | MH-15-BA-2919 | हिरो होंडा पॅशन प्रो मो. सा. | 03E21C16501 | ----- |
| 2 | MH-15-BS-3840 | बजाज वेव मो. सा. | MD2CFCSZZNAD54036 | CSEBND53943 |
| 3 | MH-15-BL-5469 | टीव्हीएस सेन्ट्रा मो. सा. | MD624AH1625B20599 | OH1B52222759 |
| 4 | MH-15-BU-1093 | हिरो होंडा स्प्लेंडर मो. सा. | 06LACF22655 | ----- |
| 5 | MH-15-AF-8247 | हिरो होंडा स्प्लेंडर मो. सा. | 99M19C00989 | 99M17M01369 |
| 6 | ----- | बजाज कंपनीची पल्सर निळ्या रंगाची | DHVBJK06450 | DHGBJG66686 |
| 7 | MH-15-AW-3943 | बजाज कंपनीची पल्सर काळ्या रंगाची | DHVBJA-10687 | DHVBJA-10682 |
| 8 | ----- | हिरो कंपनीची स्प्लेंडर काळ्या रंगाची | 07J03004864 | 02J15H05410 |

# मेळाव्यातून आपली ताकद दाखवून द्या : खा. संजय राऊत



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** गेल्या तीन–चार महिन्यांपासून हा तिकडे चालला, तो तिकडे चालला अशा अफवा शिवसेनेच्या बाबतीत उठवल्या जात आहेत. उद्धव ठाकरे व संजय राऊतही चाललेत एवढीच अफवा उठवणे बाकी आहे. अशा बातम्या येत असल्या तरी नाशकातील शिवसैनिक हा जागेवरच आहे. संघर्ष करत घाव झेलत आहे. अशी स्थिती तर बाळासाहेबांनीही बघितली आहे. त्यामुळे आता चर्चा न करता पक्ष मजबुतीसाठी सर्वांनी १६ तारखेला होणाऱ्या मेळाव्यातून आपली ताकद दाखवून द्या, असे आवाहन शिवसेना नेते खा. संजय राऊत यांनी केले.

येत्या १६ एप्रिलला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे नाशिकमध्ये येणार असून ते शिवसैनिकांशी संवाद साधणार आहेत. या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर शालीमार चौकातील शिवसेना (उबाठा) कार्यालयात शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना खा. राऊत बोलत होते. संजय राऊत पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या वेळेस नाशिक जिल्ह्यातील जागा शिवसेना व आघाडीचे उमेदवार जिंकणार, असा जनतेचा कौल होता. त्यामुळे जिल्ह्यातील जागांसाठी खेचाखेची सूरू होती. सुधाकर बडगुजर व वसंत गिते हे 'ए प्लस' मध्ये होते. त्यांचे काम चांगले होते, पण यश आले नाही. याची कारणे आहेत, मात्र आता यातून बाहेर पडावे लागणार आहे. पुन्हा उभारी घ्यावी लागणार आहे. कारण नेते हातपाय गाळतात. शिवसैनिक कधीच हातपाय गाळत नाही. आपल्या मताच्या चोऱ्या झाल्यात. आपल्यात भ्रम निर्माण करण्याचे काम केले गेले. त्यामुळे आता सावध होण्याची वेळ आली आहे, असेही राऊत म्हणाले.

भारतीय जनता पक्षाकडून गरिबांचा कैवारी म्हणून प्रचार केला जात असला तरी भाजप हा कधीच गरिबांचा कैवारी नाही. हा पक्ष केवळ पैशांसाठी काम करतो. ते पैशाच्या जोरावरच निवडून आलेले आहेत. असे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आंदोलन सुरू करण्याचे मनसैनिकांना सांगितले आणि अवघ्या २४ तासांत आंदोलन मागे घेतले. त्यांच्या लोकांनी कोणाला मारले तर वॉचमनला. राज ठाकरे आज जे आंदोलन करत आहेत हे आंदोलन बाळासाहेबांनी सुरू केले आहे. त्यावेळी आम्ही वॉचमनला नाही तर चेअरमनला मारले. त्यामुळे आज एअर इंडियात जय महाराष्ट्राचा नाद घुमतो आहे, असेही राऊत म्हणाले. शिवसैनिकांचा होणारा मेळावा हा पुढच्या राजकीय कारकीर्दीसाठी महत्त्वाचा आहे. सर्वात चंचल काय असेल तर ते राजकारण आहे. कधी कोण आयाराम व गयाराम होईल, याचा काही भरोसा नाही. त्यामुळे आता शिवसैनिकांनी तयार रहावे, नाशिक कायम शिवसेनेचच राहणार आहे, असा विश्वास राऊत यांनी शेवटी व्यक्त केला. यावेळी उपनेते सुधाकर बडगुजर, खा. राजाभाऊ वाजे, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्ताविक महानगरप्रमुख विलास शिंदे यांनी केले. व्यासपीठावर उपनेते सुनिल बागूल, अद्वय हिरे, अशोक धात्रक, संपर्क प्रमु जयंत दिंडे, सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, राज्य संघटक विनायक पांडे, नितीन आहेर, गणेश धात्रक, कुणाल दराडे, माजी आ. वसंत गिते, आनिल कदम, लोकसभा प्रमुख बाळासाहेब पाठक, उपजिल्हा प्रमुख केशव पोरजे, महेश बडवे, सचिन मराठे, कुलदिप चौधरी, मामा राजवाडे, दिलीप मोरे, राहूल ताजनपुरे, भाविसे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, बागलाण संपर्कप्रमुख विकास गिते, शिवसेना पदाधिकारी राहूल दराडे, संजय चव्हाण, आजिम सैय्यद, मसूद जिलानी, संजय थोरवे, नितीन जाधव आदी पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

# जागतिक आरोग्यदिनानिमित्त आजपासून आरोग्य सप्ताह

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** इंडियन रेड क्रॉस सोसायटी, नाशिक जिल्हा शाखा, मविप्र चे डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज हॉस्पिटल, श्री साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट आणि नाशिक सायकलिस्टस् फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त ७ एप्रिल ते १२ एप्रिल दरम्यान विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत. याचा शुभारंभ आज (दि. ७) आरोग्यजागृतीपर वर्ल्ड हेल्थ डे सायक्लोथॉन, पोस्टर स्पर्धा, रक्तदान शिबिर आणि पथनाट्य सादरीकरणाने होईल.

उद्या (दि. ८) श्री साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूटच्या सौजन्याने मोफत आरोग्य शिबिरात इसीजीसह विविध तपासण्या विनामूल्य करण्यात येतील. मविप्र मेडिकल कॉलेजच्या वतीने दि. ९ रोजी सकाळी १० ते १ अस्थिरोगनिदान, फिजिओथेरपी व जनरल सर्जरी शिबिर, १० एप्रिल रोजी नेत्ररोग व त्वचारोग शिबिर, ११ एप्रिल रोजी दंतरोग व कान–नाक–घसा विकार शिबिर तर १२ एप्रिलला स्त्री रोग व बालरोग शिबिर आयोजित करण्यात आले आहे. ही सर्व शिबिरे रेडक्रॉस येथे सकाळी १० ते १ या वेळेत होतील. सर्वांनी या उपक्रमामध्ये सहभागी होऊन आरोग्य सप्ताह यशस्वी करावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२२२४८३८० या क्रमांकावर संपर्क साधावा.

## धर्मजागरण विभागातर्फे पूजा प्रशिक्षण वर्ग सुरु

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** धर्मजागरण विभागातर्फे गेल्या १२ वर्षापासून सुरु असलेल्या पूजा प्रशिक्षण वर्गास नाशिक येथे प्रारंभ झाला. धर्मजागरविभागाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत सह संयोजक मिलिंद वाईकर (पुणे) यांनी या वर्गाचे उद्घाटन केले.

इयत्ता ७ वी ते पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण सात जिल्ह्यातील २५ प्रतिनिधी यामध्ये सहभागी आहेत. सर्व प्रतिनिधी वस्ती, पाड्यात रहाणारे आहेत. विविध धार्मिक कार्यक्रमाकरिता पुरोहित मिळत नाहीत. वर्गातील शिक्षणामुळे त्यांची सोय व्हावी आणि समाजातील अन्य घरातील बारसे, सत्यनारायण, विवाह, दशक्रिया विधी हे प्रशिक्षण घेतलेले प्रतिनिधी करणार आहेत. आजपर्यंत सुमारे ४५० प्रतिनिधी या वर्गात प्रशिक्षित होऊन आपापल्या गावी आवश्यकतेनुसार कार्य करीत आहेत. यावेळी शिवशंकर खिचडे, माधव खोत, विजय कुलकर्णी, प्रमोद पालवे सुनिल काळे उपस्थीत होते.



नवीन नाशिक भारतीय जनता पार्टीचे संघटन मंत्री रवी अनासपुरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना नाशिक शहर भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सोनाली ठाकरे व पदाधिकारी.

## आजचे वाढदिवस



किरण ठाकूर संपादक, बेळगाव तरुण भारत



विवेक फणसाळकर पोलीस आयुक्त मुंबई



रुपेश पालकर युवा सेना नाशिक जिल्हाप्रमुख

### जुन्या लाकडी वाड्यात आग

पुणे : नाना पेठेत जुन्या लाकडी वाड्याला आग लागल्याची घटना रविवारी रात्री घडली. वाडा बंद असल्याने जिवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

# पलुस्कर नाट्यगृह उघडा, नाही तर आम्ही ताब्यात घेऊ

## आज करणार नाट्यगृहात करणार एक धगधगता नाट्यप्रयोग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर नाट्यगृहाचे नुतनीकरण मार्च २०२२ मध्ये पूर्ण झाले. तीन वर्षं उलटली, पण अद्याप हे नाट्यगृह कलाकारांसाठी आणि नागरिकांसाठी उघडण्यात आलेले नाही. या दुर्लक्षित अवस्थेचा निषेध नोंदवण्यासाठी इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन (इप्टा) नाशिकच्या पुढाकाराने एक विशेष नाट्यप्रयोग आज (दि. ७) सायंकाळी ५ वाजता पलुस्कर नाट्यगृह परिसरात सादर करण्यात येणार आहे.

''किस्सा पलुस्कर का...'' या प्रयोगाच्या माध्यमातून इप्टा नाशिक प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर जळजळीत भाष्य करणार आहे. मिनी थिएटर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १६० आसन क्षमतेच्या या रंगमंचावर प्रायोगिक नाटके, सांस्कृतिक कार्यक्रम व्हावे म्हणूनच याचे नुतनीकरण करण्यात आले होते. पण आज येथे कलाकार नाहीत, रसिक नाहीत, आहेत फक्त दारुड्यांचे आणि जुगाऱ्यांचे अड्डे. हिरावाडी येथे उभारलेले नवीन भोर कलामंदिर व अशा अनेक सांस्कृतिक वास्तूंची देखील हीच अवस्था आहे. नाशिकमधील प्रमुख रंगमंच कालिदास कला मंदिर आणि परशुराम साईखेडकर नाट्यगृह हे प्रायोगिक नाट्यकर्मीसाठी परवडणारे नाहीत. त्यामुळे पालुस्कर नाट्यगृह कलाकारांसाठी हक्काचा आणि परवडणारा पर्याय ठरतो. पण तीन वर्षांची प्रतीक्षा संपता संपत नाही.

यामुळे इप्टा नाशिकने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त महानगरपालिकेला निवेदनाद्वारे पलुस्कर नाट्यगृह न उघडण्याच्या कारणांबद्दल विचारणा केली व ते लवकरात लवकर उघडण्याची मागणी केली. यासोबतच ३ वर्ष नाट्यगृह बंद ठेवण्यासाठी कोण जबाबदार आहे याची सखोल चौकशी करून दोषी व्यक्तींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी. ३ वर्ष नाट्यगृह बंद असल्यामुळे नाशिक म. न. पा. चे म्हणजेच नाशिकच्या जनतेचे जे आर्थिक नुकसान झाले आहे ते जबाबदार व्यक्तींकडून वसूल करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

एका आठवड्यात नाट्यगृह सुरू करण्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त यांनी दिले परंतु आज १० दिवस उलटूनही त्यावर काहीच कारवाई झालेली नाही. म्हणून महानगर पालिका प्रशासनाचा निषेध करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये पलुस्करची कहाणी सांगण्यासाठी इप्टाने या नाटकाचा प्रयोग आयोजित केला असून. याविरोधात केवळ नाट्यप्रयोग करून थांबणार नाही. जर या प्रयोगानंतरही पालुस्कर नाट्यगृह लवकरात लवकर उघडलं गेलं नाही, तर नाशिकचे कलाकार एकत्र येऊन हे नाट्यगृह स्वतः जाऊन उघडतील, असा थेट इशारा नाशिक महानगरपालिकेला दिला जात आहे. सर्व नाशिककरांनी या नाट्यप्रयोगाला उपस्थित राहून आवाजात आवाज मिसळावा, असं आवाहन कलाकारांतर्फे करण्यात येत आहे.

## जिल्ह्यात १६ एप्रिलपर्यंत जमावबंदी आदेश जारी

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** नाशिक ग्रामीण जिल्ह्यात आगामी सण–उत्सव काळात मानवी जिवितास, आरोग्यास, सार्वजनिक मालमत्तेस नुकसान, सुरक्षिततेस संकट उत्पन्न होऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता–२०२३ कलम १६३ (१) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून पोलीस अधीक्षक (नाशिक ग्रामीण) विक्रम देशमाने यांनी २ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्रीपासून ते १६ एप्रिल २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. आदेश राष्ट्रीय सण, लग्नकार्य, धार्मिक सण कार्यक्रम, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाही.

# १ कोटी रुपयांसाठी व्यावसायिकाचे अपहरण

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** हॉटेल व्यवसायिक निखिल दर्यानानी यांचे अपहरण केले गेले. त्यानंतर त्यांच्या भागीदाराकडून १५ लाख रुपयांची खंडणी घेतली. विशेष बाब म्हणजे निखिल यांच्याच गाडीमध्ये बंदुकीचा धाक दाखवून त्यांचे अपहरण करण्यात आले. काठे गल्ली सिग्नलवर ही घटना घडली. पैसे दिल्यानंतर निखिल हे स्वतः अपहरणकर्त्यांच्या ताब्यातून पळाले. त्यांनी संपूर्ण घटनेची माहिती मुंबईनाका पोलिसांना दिली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये एका मोठ्या जबरी चोरीच्या प्रकरणात तीन अनोळखी व्यक्तींनी एका तरुणाला बंधक करून त्याच्याकडून मोठ्या रकमांची मागणी केली. ५ एप्रिल २०२५ रोजी रात्री १२.४८ वाजता या प्रकरणी निखील प्रदीप दर्यानाणी (वय २७, रा. टाकळी रोड, नाशिक) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, ४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.१५ वाजता फिर्यादी त्यांची क्रेटा कार (क्र. एमएम १६–सीई २०२०) घेऊन काठे गल्ली सिग्नल, पुणा–नाशिकरोड येथून जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या कारचे खिडकीला टकटक करून बोलायचे आहे, असे सांगितले. ते कारमध्ये बसले आणि त्यांना नासर्डी नदीवरील पुलाजवळ आणून बंदुक दाखवून त्यांना मारून टाकण्याची धमकी दिली. या धमकीनंतर त्यांच्याकडून १ कोटी रुपये मागितले.

फिर्यादीला तत्काळ मुंबई हायवेवर घेवून जात असताना, तिथे त्यांच्या एका साथीदाराने बलेनो कारमध्ये येऊन फिर्यादीची क्रेटा कार जबरदस्तीने घेवून गेला. नंतर त्यांना कळसुबाई शिखरकडे घेऊन जात असताना गाडीच्या खाली उतरवून हवेत आणि जमिनीवर दोन गोळ्या फायर करून त्यांना धमकावले. फिर्यादींनी घाबरून त्यांच्या भाऊ नवीन यास पंधरा लाख रुपये देण्यास सांगितले. आरोपींनी पंधरा लाख रुपये घेतल्यानंतर, फिर्यादीला मारुती सुझुकी शोरुमच्या जवळ आणले आणि तेथे फिर्यादीने संधी साधून त्यांची तावडीतून सुटका केली. आरोपींनी पंधरा लाख रुपये आणि क्रेटा कार चोरल्याने, फिर्यादी यांनी या प्रकरणी पोलिसांकडे तक्रार केली आहे. याबाबत मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## राम जन्मला ग..

**(पान १ वरून)** फुगड्या घालण्याचा अनेक महिलांनी आनंद घेतला. संपूर्ण काळाराम मंदिराच्या प्रांगणात मोठ्या रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. रामजन्मानंतर नागरिकांनी दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केली होती. रात्री अन्नकुट मध्ये भगवान रामचंद्रांना ५६ पदार्थांचा नैवेद्य (भोग) दाखविण्यात आला. या अन्नकुटसाठी मंदिराचे असलेल्या पुजाऱ्याच्या प्रत्येक घरातून एक पदार्थ बनवून आणण्यात आला होता. भाविकांनी काळारामाचे दर्शन घेण्यासाठी रात्री उशिरापर्यंत लांबच लांब रांगा लावल्या होत्या. संस्थानतर्फे याठिकाणी महाप्रसादाचे वाटप देखील करण्यात आले. यावेळी अध्यक्ष, श्री काळाराम संस्थान, नाशिक तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनिलकुमार लोकवानी, विश्वस्त मंडळ धनंजय पुजारी, मंगेश पुजारी,नरेश पुजारी, मंदार जानोरकर, डॉ. एकनाथ कुलकर्णी, ॲड. दत्तप्रसाद निकम, ॲड. दिलीप कैचे, सी. ए. शुभम मंत्री, शांताराम अवसरे, मिलिंद तारे तसेच कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, खा.संजय राऊत, खा. डॉ. शोभा बच्छाव, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार अँड. राहुल ढिकले, आ. देवयानी फरांदे, आ. पंकज भुजबळ, माजी खा.हेमंत गोडसे, रंजन ठाकरे, माजी आमदार वसंत गिते, माजी नगरसेवक विलास शिंदे यांच्यासह जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिका आयुक्त मनिषा खत्री, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिका विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र आदी उपस्थित होते.

# अ. भा. मराठा महासंघ नाशिक जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत बनकर, कार्याध्यक्षपदी राजेंद्र शेळके यांची फेरनिवड





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** अखिल भारतीय मराठा महासंघ नाशिकच्या जिल्हाध्यक्षपदी निवृत्त पोलीस अधिकारी चंद्रकांत बनकर तर कार्याध्यक्षपदी राजेंद्र शेळके यांची यांची एकमताने निवड करण्यात आली.

अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या सूचनेनुसार मागील सर्व कार्यकारिणी पदे रद्द करून नवनियुक्त्या करण्याचे ठरविण्यात आले.

येथे झालेल्या महासंघाच्या सर्वसाधारण सभेत नाशिक जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत बनकर, कार्याध्यक्ष राजेंद्र शेळके आणि सरचिटणीस म्हणून ॲड. अनिल गायकवाड, कार्यालयीन प्रमुखपदी सुभाष शेळके यांची निवड करण्यात आली. तसेच युवा जिल्हाध्यक्ष म्हणून व्यंकटेश मोरे, शहराध्यक्ष संजय फडोळ, कार्याध्यक्ष सूर्यकांत आहेर, सरचिटणीस अविनाश वाळुंजे, शहर युवक अध्यक्ष सागर कातड, कार्याध्यक्ष विनोद येवले, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष गौरव गाजरे आदींची निवड करण्यात आली.

यावेळी महिला कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्षपदी ॲड. स्वप्ना राऊत, कार्याध्यक्ष रोहिणी उखाडे, सरचिटणीस वनीता मुळाणे, तसेच महिला शहराध्यक्षपदी स्वाती जाधव, कार्याध्यक्ष भारती पाटील आणि सरचिटणीसपदी अनिता भामरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. वरील सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यकारिणीची निवड करण्याचे अधिकार देण्यात आले.

याप्रसंगी योगेश पाटील, बारकू कोशिरे, अविनाश वाळुंजे, समीर वडजे, रमेश खापरे, बाळासाहेब घडवजे, सागर कातड, अनिल आहेर, ज्ञानेश्वर सुरासे, सागर बागूल, विवेक घडूजे, अमोल जाधव, अक्षय अनवट, विनोद येवले, गिरीश अहिरे, वैभव वडजे, उदय देशमुख, महेंद्र बेहरे, संदीप बरहे, हर्षल पवार, वनिता ढेरिंगे, सुमन हगवणे, पौर्णिमा मोहिते, प्रकाश उखाडे, ओमकार दुगजे, नितीन काळे आदींसह सभासद उपस्थित होते.

# श्रीराम जन्मोत्सव नाशिकरोडला उत्साहात



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** श्रीराम जन्मोत्सव नाशिकरोडसह परिसरात पांरपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रम झाले. सायंकाळी मिरवणूक काढण्यात आली.

प्रसिध्द मुक्तीधाम मंदिर व बिर्ला राम मंदिराबरोबरच, देवळालीगाव श्रीराम मंदिर, गाडेकर मळ्यातील साईबाबा मंदिर, देवी चौकातील लक्ष्मीनारायण मंदिरात दुपारी बाराला फुलांनी सजवलेल्या मूर्तीची पूजा झाली. मंदिरांवर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत भाविकांची गर्दी होती. भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

मुक्तीधामध्ये सकाळी भजन–किर्तन सेवा झाली. विश्वस्त चौहान कुटुंबातर्फे महापूजा झाली. पुजारी कृष्णानंद मिश्रा, जयंत मिश्रा, दामोदर वाघमारे यांनी मंत्रोच्चारात पुजा केली. जेडीसी बिटको चॅरीटेबल ट्रस्टचे हिरालाल चौहाण, इंदिराबेन चौहाण, विजय चौहाण, नटवरलाल चौहाण, गोपाळ चौहाण, रमेश चौहाण, मोहन चौहाण, जगदिश चौहाण, जय चौहाण, माजी नगरसेवक रमेश धोंगडे, गोपाळ लाल यांच्याहस्ते महाआरती झाली. सुरेश मानकर, ज्ञानेश्वर यंदे, सुहास लोळगे, तुकाराम निमसे, नाना पवार, संजय बेलेकर, अशोक दराडे यांनी संयोजन केले.

बिर्ला राम मंदिरात सकाळी महाभिषेक झाला. नामस्मरण व महिला मंडळाचे भजन, रामरक्षा, भक्ती संगीताचा कार्यक्रम झाला. दुपारी बाराला श्रीराम जन्मोत्सव व महाआरती झाली. सायंकाळी महाप्रसाद कार्यक्रम झाला. श्रीराम मंदिर सोसायटी व बिर्ला ट्रस्टचे व्यवस्थापक ठाकूर कुटुंबियांनी संयोजन केले. दत्त मंदिर चौकात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त दत्त मंदिर चौक मित्र मंडळातर्फे प्रतिमा पूजन झाले. सुनिल जाधव, मनिषा जाधव यांच्या हस्ते पूजा झाल्यानंतर महाप्रसाद वाटप झाले. अतुल धनवटे माजी नगरसेवक अंबादास पगारे, अनिल ताजनपुरे, सुदाम ताजनपुरे, संतोष भामरे, सुनिल मेंढेकर, आनंद कवळे, सचिन शिसोदे, मंगेश पगार, शरद घुगे, गोविंद विश्वकर्मा, स्वराज ताजनपुरे, संकेत मेंढेकर, उदय थोरात, किरण साळवे, विलास कांबळे, राजू मोरे, शरद घुगे, अंकुश बोचरे, गौतम पगारे, सुनिल जाधव, चंदा कंटक, संग्राम फडके आदी उपस्थित होते. देवळाली गावातील श्रीराम मंदिरात ॲड. दिपलक्ष्मी देशमुख यांच्याहस्ते पुजा, महाआरती झाली. पंच समितीचे अध्यक्ष शांताराम कदम, बाळानाथ सरोदे, प्रदिप देशमुख, मनोहर कोरडे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष योगेश गाडेकर, सोमनाथ मोरे, महेश देशमुख, बंटी कोरडे, मंगेश लांडगे, निलेश ठाकूर, राजू कोटमे, प्रमोद बुवा, संतोष शिंदे, मनोज जोशी, लंकेश गाडेकर, संजय जोशी, बंटी तनपुरे आदी उपस्थित होते. देवी चौकातील लक्ष्मीनारायण मंदिरातही राम जन्मोत्सव साजरा झाला.

## कॉफीतून गुंगीचे औषध देऊन मैत्रिणीचे दागिने चोरी

**पुणे (भ्रमर वृत्तसेवा):–** मैत्रिणीला कॉफीतून गुंगीचे औषध देऊन कपाटातील दागिने चोरुन पसार झालेल्या तरुणीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. तरुणीकडून साडेपाच लाख रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी एका २५ वर्षीय तरुणीला अटक करण्यात आली आहे. याबाबत आरोपीच्या तरुणीच्या मैत्रिणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी तरुणी आणि आरोपी मैत्रिणी आहेत. तरुणी मैत्रिणीच्या घरी आली होती. त्या वेळी तिने मैत्रिणीला कॉफी करुन दिली. तिच्या नकळत कॉफीत गुंगीचे औषध मिसळले. मैत्रीण बेशुद्ध पडल्याने तिने कपाटातील पाच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरुन ती पसार झाली.



# आमदार ढिकले यांच्या निधीतील सभामंडपाचे लोकार्पण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** आदिवासी समाजाचे आस्थास्थान असलेल्या याहा मोगी कणसरा माता ठाण, बोरगड म्हसरूळ येथील मंदिर परिसरात ५० लक्ष रुपये खर्च करून भव्य सभा मंडप उभारण्यात आला.

या मंदिराची मूर्ती स्थापना व सभामंडपाचा लोकार्पण सोहळा अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते झाला. आ, ॲड. राहुल ढिकले, पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, माजी महापौर रंजना भानसी, माजी गटनेते अरुण पवार, भाजपा शहर सचिव अमित घुगे, राहुल पवार, माजी नगरसेवक वसंतराव मोराडे, एन. डी. गावित आदी मान्यवर उपस्थित होते. मंदिराच्या कलशाचे पूजन आ. ॲड. राहुल ढिकले यांच्या हस्ते झाले. यावेळी मांडव मिरवणूक, तेलवण, ढाकवादन तसेच पूर्वजांची आळवणी, याहामोगी कणसरा माता प्रतीकाची स्थापना व कलश, ध्वजारोहण, पुष्पांजली आणि सभामंडप लोकार्पण झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजी महापौर रंजना भानसी, रमेश भोये, दत्तोबा साबळे, पोपट भानसी, राहुल गावित, अतुल भानसी, गणेश आहेर, ललित राऊत, मनोज झिरवाळ, मनोज पवार, किरण महाले, दुर्वदास गायकवाड, पांडुरंग गायकवाड, मोतीराम चव्हाण, सचिन पवार आदींनी परिश्रम घेतले.

# अंबडमधील चोरी उघडकीस

## गुन्हे शाखा युनिट २ ची यशस्वी कारवाई

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** गेल्या आठ दिवसांपूर्वी अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या जनावरांच्या चोरीचा गुन्हा गुन्हे शाखा युनिट–२ ने उघडकीस आणत दोन चोरट्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली अंदाजे ७ लाख रुपये किंमतीची चारचाकी गाडी जप्त करण्यात आली आहे. नाशिक शहरात वाढत असलेल्या जनावरांच्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कठोर पावले उचलण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट २ चे अधिकारी व कर्मचारी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करत असताना, सपोउनि सुहास क्षिरसागर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, काही दिवसांपूर्वी अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीतून शेळ्या व बोकड चोरी करण्यात आले होते. संबंधित आरोपी सध्या बालभारती, लेखानगर, इंदिरा गांधी वसाहत परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर युनिट–२ च्या पथकाने तत्काळ कारवाई सुरु केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत तोडकर (प्रभारी अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुहास क्षिरसागर, प्रेमचंद गांगुर्डे, पोलीस हवालदार संजय सानप, चंद्रकांत गवळी, प्रविण वानखेडे, सुनील खैरनार आदींनी लेखानगर परिसरात सापळा रचून पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीसह दोन इसमांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे तोहिद उर्फ अमन आतीष खाटीक (वय २३, रा. एन–९ पीजी, लेखानगर), मनी बहादुर रामजस यादव (वय ३८, रा. हनुमान चौक, शिवाजी चौक, नवीन नाशिक) अशी सांगितली. दोन्ही आरोपींनी पोलीसी तपासात गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी काही दिवसांपूर्वी अंबडगाव येथील एजन्सीच्या शेडलगत असलेल्या रस्त्यावरून शेळ्या व बोकड चोरून स्विफ्ट गाडीत टाकून चोरी केल्याची माहिती दिली. आरोपींच्या कबुलीच्या आधारावर गुन्ह्यात वापरलेली अंदाजे ७ लाख रुपये किंमतीची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट गाडी जप्त करण्यात आली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.